MAHMARI 19358/13/1/2000 - TC

प्रज्वालितो ज्ञानमयः प्रदीपः

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा • ठाणे

व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष पंधरावे / अंक १ / जानेवारी २०१४

## संपादकीय

### जास्त कडू थोडे गोड

२०१२ हे वर्ष संपले. ते करुण कहाणीच्या भयानक अंधारात. त्यानंतर २०१३ सालामधील सूर्य उगवताना आम्ही पाहिला. या सूर्याच्या उजेडात आता काही तरी नवीन दिसेल, असे वाटत असतानाच अपेक्षा भंग झाला. आपल्या सगळ्या संवेदना बधिर होतील असे वाटेल न वाटेल अशा सीमारेषेवर २०१४ हे वर्ष उजाडले. भाबड्या माणसाचे सामान्य जीवन आशेवर चालू असते. सुख दुःखाच्या वाटणीत, सुखच आपल्या वाट्यास यावे ही प्रत्येकाची मनीषा असते.

या नवीन वर्षाकडून अशी अपेक्षा ठेवून जीवनाचे नवीन संदर्भ असणारे वर्ष सुरू तर झाले; परंतु ज्या गुंत्याला ६५ वर्षाहून अधिक इतिहास आहे त्या गुंत्यांत आणखीन एका वर्षाची भर पडली. प्रश्नांचा हा गुंता हातात घेऊन मांध्यमांसकट सर्वांनी 'हॅपी न्यू इयर' अशा आरोळ्या ठोकल्या. या आरोळीलाही आम्ही इतके सरावलो आहोत, की नवीन वर्ष आले म्हणजे कॅलेंडर बदलायचे एवढाच उपचार उरायला लागला.

ज्येष्ठ नागरिकांची संख्या हे एक उदाहरण पाहता येईल. जगभरातील अभ्यासू समाज शास्त्रज्ञ आणि अर्थशास्त्रज्ञ यांनी ज़ो वेध घेतला, त्यानुसार जगभर वाढणाऱ्या महागाईला निवृत्तांची वाढती संख्या हे एक कारण त्यांना आढळले. महागाई मारुतीच्या शेपटाप्रमाणे वाढतच चालली आहे. एकीकडे खरेदीची हाव आणि वखवख, दुसरीकड़े मिळणारा पैसा यांचे गणित फसत चालले आहे. पुढील काळात निवृत्तांची संख्या कल्पनातील वाढत जाईल आणि जीवन व्यवहाराचा कणा असलेले अर्थकारण कोलमडून पडेल. अशी ही भीती जाणवते आहे. निवृत्तीचे वय वाढवणे हा पर्याय निवडण्याकडे संबंधितांचा कौल वाढेल आणि तरुण हातांना काम मिळाले नाही, तर सामाजिक आव्हाने वाढतच राहतील.

२०१३ या सरत्या वर्षातील अनेक घटकांवर, समस्यांवर, आव्हानांनवर खूप विचार करण्यासारखा आहे. प्रश्नांचा हा गुंता अधिकाधिक वाढत जाईल, असे आजची परीस्थिती सांगत आहे. खुजे नेतृत्त्व, कोणतीही कृती भ्रष्टाचार

(पृष्ठ क्र २ वर)

ठरण्याची वाढती शक्यता, सर्वत्र वाढणारा दुराचार हे सर्व कटु वाटले तरी सत्य आहे. शेतकरी जीवनातील प्रश्न, शिक्षक, डॉक्टर आणि इतर असंख्य व्यवसाय यांच्या कार्यशैलीत वाढणारे प्रश्न यांनी जगणे अवघड करून टाकले आहे. नितीमत्तेचा इतिहासातील राष्ट्र पुरुषांचा, भारतीय परंपरांचा अर्थही न कळता डंका वाजवणारे नेते, ही आजची मोठी चिंता आहे. स्थानिक पातळीवर स्वघोषित गुंडागिरीची प्रवृत्ती असणारे नेते, त्यांच्या जोरावर समाजाची लूट करणारे कार्यकर्ते अशा सगळ्यांनाच देशाची वाताहात करायची आहे की काय असे वाटते.

गेले वर्ष जागतिक पातळीवर अनेक आंदोलने, हिंसा अशा घटनांनी व्यापले होते. या वर्षी ब्राझिल इंडोनेशिया, भारत अशा अनेक देशांमध्ये निवडणुकांचे वारे वाहतील; किंबहुना असे वारे वहायला सुरुवातही झाली आहे. जगाची बरीच मोठी लोकसंख्या मतपेटीद्वारे आपले मत व्यक्त करेल. निवडणुकांवर होणारा खर्च, पक्षाला उभे करावयाचे पैसे निवडणूकपूर्व किंवा मतदानोत्तर अंदाज हे सर्व आपल्याकडेही सुरू झाले आहे. सर्वच क्षेत्रांमध्ये समोरच्याचे ऐकू न घेता मुजोरपणा करण्याची वृत्ती वाढत आहे. 'स्त्रीचे संरक्षण फक्त स्त्रीच करू शकेल, असे सांगणाऱ्या विवेकानंदांच्या विचारांना आम्ही माती फासली आहे. घरादारामध्ये अनेक स्त्रिया असुरक्षित आहेत, हे तर सत्यच आहे; पण काही वेळा स्त्रीत्वाचे भांडवल करून समाजाला फसवणाऱ्या स्त्रियाही आहेत.

स्वतंत्र नसलेल्या स्वातंत्रपूर्व काळातील समाज व त्या काळातील साहित्यात आलेल्या व्यक्तिरेखा आज जर जन्माला आल्या तर निराशेने आत्महत्याच करतील. आजच्या स्वातंत्र्याला ती पिढी घाबरेल, अशी आजची स्थिती आहे.

३१ डिसेंबरला रात्री किती वेळ धांगडधिंगा करायचा हा प्रश्न न्यायालयापर्यंत न्यावा लागतो. साहित्य संमेलनात काहीना काही वाद निर्माण होतात. उच्च न्यायालयापासून कनिष्ठ न्यायालयांपर्यंत दिले जाणारे निकाल सामान्य माणसाला अगम्य असतात. हे असे वास्तव पाहिले की पारतंत्र्याच्या सावलीत आपण स्वातंत्र्याच्या भातुकलीचा खेळ खेळत आहोत की काय, असे वाटायला लागते.

लोकपाल विधेयक आणि दिल्लीत झालेला सत्ताबदल यांमुळे जनतेच्या मनातील खदखद बाहेर पडत आहे. म्हणूनच या घटना आज तरी अपेक्षा पूर्ण करतील, असे लोकांना वाटते. या सर्वांचा अर्थ चांगले काही होतच नाही असे नाही; मूठभर माणसे चांगली असतात. त्यांच्या जोरावर समाज पुढे जातो, या म्हणण्यात तथ्य आहे. निराशेचा काळा घनघोर अंधार संपण्याची स्वप्ने पडतात, म्हणून जीवन चालू रहाते. भारतात तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात व आंतराळ क्षेत्रात घडणाऱ्या काही घटना निष्ठेने काम करणाऱ्या संशोधन संस्था व त्यांतील वैज्ञानिक अशा काही माणसांच्या पुण्याईवर जीवन चालू रहाते. जनतेशी प्रतरणा करणारे शासनकर्ते, मंत्री संत्री या पार्श्वभूमीवर हा एक धागाही जीवनाची साक्ष देतो. 'जगाच्या पाठीवर' या चित्रपटात हे सत्य सांगणाऱ्या

एक धागा सुखाचा। शंभर धागे दुःखाचे
या ओळींतून हेच सत्य सांगितले आहे.

**– मोहन पाठक**

●●●

वर्ष पंधरावे/अंक १/जानेवारी २०१४

वर्ष पंधरावे/अंक १ /जानेवारी २०१४

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
श्री. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १८ वे/अंक ७ वा)

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे – ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
www.vpmthane.org

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
Email : perfectprints@gmail.com

## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | श्री. मोहन पाठक | |
| २) | इस्त्रायलमधील शिक्षणप्रणाली | डॉ. सुधाकर आगरकर | ३ |
| ३) | प्राचीन भारतीय सौंदर्य साधना | सौ. स्वाती महेश भालेराव | ६ |
| ४) | सुसंवाद (मेडीएशन) काळाची गरज | प्रा. एम. डी. बनसोडे | ८ |
| ५) | साहित्य–जगत | श्री. शरद जोशी | १० |
| ६) | श्रीमत् भगवद् गीता – अध्याय बारावा<br>विषय : भक्तियोग | कै. शं. बा. मठ | १४ |
| ७) | नर्मदा परिक्रमा<br>भाग : १ | श्री. अरविंद ओक | १९ |
| ८) | भारतीय संस्कृती–बीज, मॉडेल व साधना | श्री. यशवंत साने | २५ |
| ९) | परिसर वार्ता | संकलित | २९ |


या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ अभ्यासपूर्ण लेखांसाठी आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: देणगी मूल्य द्या व इतरांना द्यायला सांगा.
- आपले देणगी मूल्ये द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगी मूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर नौपाडा, ठाणे ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेची देणगी मूल्य पाठवावी.
- www.vpmthane.org या संकेत स्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगी मूल्याच रु. २५०/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.

– संपादक

# इस्त्रायलमधील शिक्षणप्रणाली

*वेगवेगळ्या भाषा आणि संस्कृतींत वाढलेल्या मुलांना एकत्रितपणे शिकवणे हे इस्त्रायलच्या शिक्षण विभागासमोरील मोठे आव्हान होते. ते त्यांनी कसे पेलले, याचा इस्त्रायलच्या शाळा आणि महाविद्यालयांना भेटी देऊन सुधाकर आगरकरांनी घेतलेला धांडोळा – संपादक*

बेन गुरिअन विद्यापीठाच्या निमंत्रणावरून नुकताच इस्त्रायलला जाण्याचा योग आला. या भेटीत इलाट, तेल अवीव, जेरुसलेम या शहरांतील शाळा आणि महाविद्यालयांना भेटी देऊन तेथील शिक्षणप्रणाली बघता आली.

दुसरे महायुद्ध अनेक कारणाने गाजले. त्यात लाखो लोकांना आपले जीव गमवावे लागले. या युद्धात युद्धभूमीवर तर लोक मरणपावलेच, त्याखेरीज कँम्पमध्ये लाखो लोकांचे जीव गेले. ज्यू धर्माच्या लोकांना अशा कँम्पमध्ये एकत्र करून यमसदनाला पाठविण्यात आले. त्यात अनेक संसार उद्‌ध्वस्त झाले. प्रौढांबरोबरच बालकांचादेखील शिरच्छेद करण्यात आला. त्यामुळे ज्यू धर्मीय लोकांमध्ये एक प्रकाराचे नैराश्य पसरले. या पार्श्वभूमीवर इस्त्रायल देशाची स्थापना झाली. आपली अस्मिता जागी करणे त्यांच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे होते. त्यांची गरज ओळखून त्यावेळच्या विचारवंतांनी हिब्रू भाषेतून शिक्षण देण्याचा निर्णय घेतला. हिब्रू ही ज्यू लोकांची भाषा असली तरी ती भाषा अवगत असलेल्या लोकांची संख्या मर्यादित होती. याहीपेक्षा महत्वाचे म्हणजे हिब्रू ही बोलीभाषा जास्त आणि ज्ञानभाषा कमी, असेच तिचे स्वरुप होते. या भाषेत शिक्षण देण्याची फारशी सोय उपलब्ध नव्हती. शालेय स्तरावरील सर्व विषय हिब्रू भाषेत शिकवायचे तर त्यासाठी पाठ्यपुस्तके तयार करावी लागणार होती. ते काम त्यांनी युद्धपातळीवर हाती घेतले. हिब्रू भाषेत शिक्षण देऊ शकतील, असे शिक्षक तयार केले. त्याचबरोबर मोठ्या प्रमाणावर हिब्रू भाषेत शैक्षणिक साहित्य तयार केले. त्याचा परिणाम असा झाला की, सर्वत्र हिब्रू भाषेतून शिक्षण देणाऱ्या शाळा सुरू झाल्या.



आपल्याकडे प्रादेशिक भाषेतून शिक्षण द्यायचे म्हटले की पारिभाषिक शबदांचा प्रश्न निर्माण होतो. हा प्रश्न त्यांनी कसा सोडवला, हे जाणून घेण्याची माझी उत्सुकता होती. म्हणून मी शाळेतील एका विज्ञान शिक्षकाला विचारले. त्यावर त्याने दिलेले उत्तर मोठे मार्मिक होते. तो म्हणाला, ''हिब्रू भाषेत पर्यायी पारिभाषिक शब्द उपलब्ध असतील तर ते आम्ही घेतो. नसतील तर मात्र नवीन शब्द निर्माण करण्याच्या भानगडीत आम्ही पडत नाही. इंग्रजी भाषेतील शब्द जसेच्या तसे आम्ही घेतो. फक्त त्याचा उच्चार हिब्रू भाषेप्रमाणे करतो.''

मला वाटते, नवनवीन बोजड पारिभाषिक शब्द तयार करीत बसण्यापेक्षा हा मार्ग चांगला आहे. नाहीतरी इंग्रजी

भाषेने लॅटिन आणि ग्रीक भाषेतून शब्द जसेच्या तसे घेऊन आपली भाषा अधिक समृद्ध केलीच ना?

सहा ते १४ वयोगटातील विद्यार्थ्यांना मोफत आणि सक्तीचे शिक्षण देण्याचा आपण कायदा केला. परंतु तो कागदावरच राहिला. सरकारला नवीन शाळा काढणे शक्य नाही, हे कारण देऊन विना अनुदानित शाळांना आपल्या देशात परवानगी दिली जात आहे. इस्त्रायलमध्ये मात्र शालेय शिक्षणाची संपूर्ण जबाबदारी सरकारने उचलली आहे. उत्तम इमारती आणि सुविधा असलेल्या शाळा सर्वत्र सुरू केल्या आहेत. एवढेच नव्हे तर, इतर व्यवसायांतील व्यक्तींना शाळेत जाऊन शिकवायला उत्तेजन दिले जाते. इलाट शहरातील एका शाळेत मी गेलो, तर तिथे मला सौनिकी गणवेशातील एक व्यक्ती भेटली. तिने आपली ओळख त्या शाळेतील विज्ञान शिक्षक अशी करून दिली. चौकशी केली असता असे कळले की, तो सैन्यात नोकरीला आहे. सैनिकी पेशाबरोबरच त्याला शाळेत शिकवायला आवडते. म्हणून त्याने सरकारला विनंती केली. त्याची विनंती मान्य करून पूर्णवेळ शिक्षक म्हणून काम करण्याची त्याला परवानगी देण्यात आली. तो त्या शाळेत रसायनशास्त्र शिकविण्याचे काम करतो. शाळेच्या विद्यार्थ्यांमध्ये तो चांगलाच रुळला आहे. तो काम करतो शाळेत; परंतु त्याचे वेतन मात्र येते सैनिकी खात्यातून!

दुसऱ्या एका शाळेत गेलो तर तिथे मला विद्यापीठात शिकविणारे प्राध्यापक भेटले. ते विद्यापीठात सूक्ष्मजीवशास्त्र शिकवितात. त्या शहरातील शाळेला जीवशास्त्र शिकविणाऱ्या एका अनुभवी व्यक्तीची गरज होती. शाळेने विद्यापीठाकडे विचारणा केली आणि विद्यापीठाने जीवशास्त्र विभागातील एका प्राध्यापकाला अर्धवेळ शाळेत काम करण्याची सूचना केली. महत्त्वाचे हे की, विद्यापीठाची ही सूचना त्या प्राध्यापकाने आनंदाने स्वीकारली. शाळेत जाऊन शिकवणे हे त्यांना कमीपणाचे मुळीच वाटले नाही. विद्यापीठातील शिक्षण आणि संशोधनाबरोबरच शालेय शिक्षणदेखील ते तेवढ्याच गांभीर्याने घेतात. त्यांना मी विद्यापीठात भेटलो. त्याचबरोबर त्यांचा शाळेतला पाठदेखील पाहिला. एका शार्क माशाचे विच्छेदन त्यांनी शाळेतील विद्यार्थ्यांना करून दाखविले. विशेष हे की, त्यांचे पूर्ण वेतन विद्यापीठच देते. 'तू शाळेत काम करतोस तर अर्धा पगार त्यांच्याकडून घे,' असे त्याला सांगितले जात नाही. यावरूनच या देशात शालेय शिक्षणाला किती महत्त्व देतात, ते दिसून येते.

ज्यू लोकांचा एक वेगळा देश असावा म्हणून इस्त्रालयची स्थापना करण्यात आली. देशाच्या निर्मितीनंतर जगाच्या वेगवेगळ्या भागांत रहात असलेल्या ज्यू वंशाच्या लोकांना नव्या देशात पाचारण करण्यात आले. १९४८ पासून बाहेरून लोक यायला लागले. ती प्रक्रिया अजूनही सुरू आहे. भारतात रहात असलेले अनेक ज्यू वंशाचे लोक इस्त्रायलमध्ये गेले. मूळची पुण्याची असलेली एक व्यक्ती मला इलाट शहरात भेटली. त्यामुळे महाराष्ट्रापासून एवढ्या लांब अंतरावर मला मराठीत बोलता आले. त्या लहानशा गावात शंभरहून अधिक मराठी भाषिक कुटुंबे आहेत असे मला त्यांनी सांगितले. भारताखेरीज युरोप, आशिया, अमेरिका, आफ्रिका अशा वेगवेगळ्या खंडांतून लोक तेथे आले. प्रत्येकजण येताना आपली भाषा आणि संस्कृती सोबत आणतो. अशा वेगवेगळ्या वातावरणांत वाढलेल्या मुलांना एकत्रितपणे शिकवणे हे एक आव्हानच असते. इस्त्रायल देशाच्या शिक्षण विभागाने हे आव्हान लीलया पेलले आहे. सर्वसमावेशक अशी शिक्षण प्रणाली त्यांनी विकसित केली. त्यासाठी शिक्षकांचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले. वेगळ्या पार्श्वभूमीतून आलेल्या विद्यार्थ्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शाळेत विशेष कार्यक्रम राबवले गेले. याचा परिणाम असा झाला, की, प्रत्येकजण तेथे रुळला आणि आपापल्या क्षमतेनुसार प्रगती करू शकला.

---

सुदृढ शरीर व सक्षम मन हवे असल्यास, भूतकाळ आणि भविष्याचा विचार करू नका. वर्तमानात जगण्याचा प्रयत्न करा.

इस्त्रायल देशात काही मोजकीच शहरे आहेत. बराचसा भाग वाळवंटाने व्यापलेला आहे. त्यामुळे शहरी शाळा आणि ग्रामीण शाळा अशी तफावत आढळते. ही तफावत दूर करण्याचा कसोशीने प्रयत्न केला जात आहे. यासाठी ग्रामीण शाळांना अद्ययावत सुविधा पुरविण्यात येत आहेत. त्याचबरोबर प्रशिक्षित शिक्षकांनी ग्रामीण भागांत जाऊन अध्यापनाचे काम करावे, यासाठी त्यांना विशेष उत्तेजन दिले जात आहे. ग्रामीण, शहरी याचबरोबर ज्यू, अरब असे भेददेखील तेथे पाहायला मिळातात. इस्त्रायल देशाची स्थापना झाली तेव्हा जे अरब लोक तेथे रहात होते. त्या सर्वांना त्या देशाचे नागरिकत्व बहाल करण्यात आले. शाळेत ज्यू-अरब असा भेदभाव होणार नाही, असा प्रयत्न करण्यात आला. तरीही मूळचे अरब रहिवासी शिक्षणात मागे पडतात असे आढळते. या समस्येवर मात करण्याचे प्रयत्न चालू आहेत. त्यासाठी अरबी माध्यमातून शिक्षण देणाऱ्या शाळा काढण्यात आलेल्या आहेत. त्याचबरोबर अरबी लोकांना नवीन शाळा सुरू करण्यासाठी उत्तेजन देण्यात येत आहे. लिंगभेद तेथे फारसा जाणवत नाही. मुलींनादेखील समान शिक्षणाची संधी उपलब्ध आहे. याचा तेथील महिलांनी चांगला लाभ घेतला आहे. पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियादेखील वेगवेगळ्या क्षेत्रांत आगेकूच करीत असल्याचे दृश्य इथे पाहायला मिळते.

**डॉ. सुधाकर आगरकर**
सी-१४, विसावा वैभव नगरी,
कल्याण शीळ रोड,
काटई, ता. कल्याण
जि. ठाणे - ४२१२०४

●●●

## जास्त पाणी पिण्याचे फायदे

- त्वचा चांगली होते.
- शरीरातली विषारी द्रव्यं निघून जातात.
- हृदयविकाराचा झटका येण्याचा धोका कमी होतो.
- सांधे आणि स्नायू यांना कुशन मिळतं, वंगण मिळतं आणि त्यांची हालचाल सहज होते.
- ऊर्जा प्राप्त होते, आपण सतत जागरूक राहतो.
- कामाला नियमितता येते.
- वेगवेगळ्या प्रकारचे आजार आणि संसर्ग होण्याची शक्यता कमी होते.
- शरीराचं तापमान नियंत्रित राहतं.
- चरबी जाळली जाते आणि स्नायू, बळकट होतात.
- फिटनेस वाढतो.

**- संकलित**

●●●

कोणतेही ध्येय गाठायचे, तर आपली कुवत लक्षात घेऊन ठोस उद्दिष्टे निश्चित करणे, त्यांच्यापूर्ततेसाठी ठोस कृती योजना आखणे आणि चिकाटीने ती प्रत्यक्षात उतरविणे, हे आवश्यक असते. तहान लागली की पाणी मिळतेच. पण, तहान लागत नाही ही खरी समस्या आहे आणि तहान कशी लागेल, या प्रश्नाला उत्तर नाही.

**- संकलित**

●●●

जे तुमच्याशी वाईट वागलेत. त्यांच्याशीही प्रेमाने वागा. ते चांगले वागतील, या आशेने नव्हे, तर तुम्ही चांगले आहात म्हणून.

# प्राचीन भारतीय सौंदर्य साधना

*शरीराचे सौंदर्य वाढवायचे, चार चौघात उठून दिसायचे ही माणसाची पारंपरिक गरज या सौंदर्य प्रसाधनेचा भारत संदर्भातील ही विचार या विषयावर अजून लेख यावेत ही अपेक्षा .*

शरीराचे सौंदर्य वृद्धिंगत करण्याचा उपचार, म्हणजे प्रसाधना होय. प्रसाधनांची प्रवृत्ती ही मानवाची जन्मजात प्रवृत्ती होय. नागरी जीवनापासून दूर राहणाऱ्या वनकन्या झाडांची पाने, फुले, फळे इ. वस्तूंनी शरीर सुशोभित करीत असतात. कालिदासाच्या 'कुमारसंभव' या काव्यातील पार्वती, 'अभिज्ञान शाकुंतलम्' नाटकातील शकुंतला यांचे प्रसाधन लतापल्लवांनीच होत असे.

प्रसाधनाचे आंतरिक व बाह्य असे दोन प्रकार होतात. आंतरिक प्रसाधनांत पौष्टिक भोजन व व्यायाम या दोन गोष्टी येतात. प्राचीन काळी आंतरिक प्रसाधनासाठी औषधांचाही उपयोग करीत असत, त्यामुळे दीर्घकाळापर्यंत शरीर स्वस्थ आणि सुंदर होण्यास मदत होत असे. दात पडू नयेत, केस गळू नयेत, डोळे तेजस्वी असावेत, त्वचेवर सुरकुत्या पडू नयते व अंगकांती सतेज राहवी यासाठी प्राचीन लोक सतत प्रयत्नशील असत. बाह्य प्रसाधनात दंतमंजन, विविध प्रकारची उटणी, केसांना लावायचे तेल, डोळ्यांत घालायचे अंजन सुगंधी द्रव्ये, ओठ व नखे रंगवायची द्रव्ये, मेहंदी, अल्ता ३ द्रव्ये येतात. तसेच विविध वस्त्रे परिधान करणे, पुष्पमाला व अलंकार धारण करणे या गोष्टीही प्रसाधनांत अंतर्भूत होतात.

विवाह संस्कारातही अशा प्रकारची प्रसाधने करण्याची प्रथा वैदिक कालात होती. वैदिक कालातील जीवन रसपूर्ण होते आणि गृहस्थ बनून जीवनाचा सुखपूर्वक उपभोग घेण्याची शिकवण स्त्री पुरुषांना देण्यात येत होती. वैदिक साहित्याशिवाय प्राचीन उत्खननातूनही याबद्दल पुरावा सापडतो.

मोहोंजोदडो येथील उत्खननात सापडलेली स्नानगृहे, केसात खोचावयाच्या फण्या, कंगवे, आरसा, काजळ घालायची शलाका, केस कापायचे वस्तरे, हिरवा दगड, हस्तिदंत इत्यादींच्या प्रसाधन पेट्या, तांब्याचे तेलाचे भांडे इ. वस्तूंवरून सिंधुसंस्कृतीतील लोक आपले शरीर स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी आजच्या नागरिकांप्रमाणेच दक्ष होते. हे समजून येते. मातीच्या मूर्तीवरून त्याकाळी लोक वस्त्रे व अलंकार लेवून शरीर सुशोभित करीत असत, हे ही कळते.

रामायणात, अनुसूयेने सीतेला अनुलेपन व दिव्य अंगराग दिल्याचा उललेख आहे. पूर्वी स्त्रिया सुगंधी द्रव्यांचा लेप लावीत, भुवयांना काजळ लावून त्या काळ्या करीत, असे वर्णन महाभारतातील कर्ण पर्वात आले आहे.

पाणिनी, पतंजली, कौटिल्य इत्यादी ग्रंथकारांच्या ग्रंथांतील उल्लेखावरून त्याकाळचे लोक अंजन, तगर, गुग्गुळ, चंदन, अगरु इ. सुगंधी द्रव्यांचा प्रसाधनात उपयोग करीत असे, हे कळते. कौटिल्याने अर्थशास्त्रात मनःशिला, हरिताल व कालेयक् यांपासून तेल कसे काढायचे ते सांगितले आहे. प्रसाधनासाठी, लेप वगैरे कसे बनवीत ते अश्वघोषाच्या 'सौदरानंद' काव्यात सांगितले आहे. मुखावरील अंगराजाचे शरीरावरील पत्र रचनेचे वर्णनही या ग्रंथात सापडते. स्त्रिया आपले पाय, नखे व ओठ रंगवीत, डोळ्यात काजळ घालीत व अंगावर अलंकार घालीत असे, असाही उल्लेख त्यात आढळतो.

बौद्ध कालातील प्रसाधनांसंबधीची माहिती जातके व विनयपिटक या ग्रंथावरून मिळते. मालागंध, विलेपन, मंडन, विभूषण, संवाहन या सर्वांचा समावेश प्रसाधनात होई. त्या काळच्या स्त्रिया मुखावर लेप लावीत, चूर्ण चोपडीत आणि अंगाला अंगराज लावीत होत्या. भिक्षुंना मात्र हे सर्व प्रसाधन वर्ज्य होते.

स्नान ही तर आवश्यक बाब होती. सर्वसामान्य लोक

अनेकदा आपल्याला ज्या गोष्टीचे भय वाटत असते, त्या गोष्टी प्रत्यक्षात तशा घडतच नाहीत, असे आपल्या नंतर लक्षात येते.

नदी, तलाव किंवा विहीर या ठिकाणी स्नान करीत, नदीच्या घाटावर अंगाला लावण्यासाठी सुगंधी माती व चूर्ण ठेवलेले असे; गार पाण्याच्या स्नानाशिवाय गरम पाण्याने स्नान करण्यासाठी जन्तक घरे बांधलेली होती. चुल्लवग्गात या जन्तक घराची माहिती मिळते. या घरांच्या स्वच्छतेचे नियम, पाणी वाहून जाण्यासाठी पन्हळी बनविणे स्नानाच्यावेळी गडबड न करणे इ. उल्लेख आहेत. भिक्षू भिक्षूणी व सर्वसामान्य लोक या लोकांना जन्तक घरात स्नान करायला परवानगी होती.

त्याकाळी स्त्रिया गालावर चित्रकर्म करीत व लाक्षारसाने हाताची नखे व पाय रंगवीत. निरनिराळी सुगंधी अत्तरे तयार होत असत. काशी चंदन हे त्यातले मुख्य द्रव्य होते. गंधी लोक अत्तरे, सुगंधी द्रव्ये विकीत असे.

मौर्यकाल हा वैभव संपन्न काल होता. त्या चंदन, अगरु, गुग्गळ व सुगंधी द्रव्ये दक्षिण भारतातून व समुद्रापलिकडूनही येत असत. सुगंधी द्रव्यांचा वापर विशेष होत होता. राजाचे शयन कक्ष व इतर दालने यात अगरु व चंदन जाळून धूर करीत असे.

पुरुषांपेक्षा स्त्रियांची प्रसाधन सामग्री अधिक असे. आपल्या पतीला दीर्घायुष्य, लाभवे अशी इच्छा करणाऱ्या सुवासिनींना हळद, कुंकू, शेंदूर, काजळ, कंचुकी, तांबूल, मांगलिक आभूषणे, केस विंचारणे, मस्तक, हात व कान यात अलंकार, मेहंदी, दंत मंजन, अंजन, तिलक, हनुवटीवर तीळ बनविणे, अरगजालेपन, तांबूल माला व गजरा इत्यादी सोळा प्रकारचे शृंगार मानलेले आहेत.

सोळा शृंगाराच्या या नावात बदलही आहेत. वल्लभदासाने आपल्या सुभाषितात चारे, नासामौक्तिक, मेखलारणन व करदर्पण ही शृंगाराची वेगळी नावे दिली आहेत; तर उज्ज्वल नीलमणीने राधाप्रकरणात असितपट, अंगचर्चने, हनुवटीवर कस्तुरीने चित्र काढणे व शरीरावर पत्रभंगरचना करणे यांचा सोळा शृंगारात अंतर्भाव केला आहे.

मेघदूतावरील टीकेत मल्लिनाीने कचधार्म (केसांच्या विविध रचना) देहधार्य (शरीराची शोभा वाढविणे) परिधेय (भूप्रसाधान, भुवयांचे सौंदर्य) व देशानुसार शृंगार असे शृंगार सांगितले आहे त्याचे वर्णन असे.

त्याचप्रमाणे नेत्रप्रसाधन, कपोलप्रसाधन, ओष्ठ प्रसाधन, कर्ण प्रसाधन, चरण प्रसाधन इत्यादी विविध प्रकारच्या विविध प्रसाधनांचा उल्लेख केलेला व त्याचे वर्णन आढळते.

वैदिक काळात देखील बरेचसे संस्कार प्रसाधनांनी होत असे, जसे समावर्तन संस्कार इत्यादी.

कालिदास, बाणभट्ट इ. संस्कृत कवींच्या ग्रंथात प्रसाधन कलेचे अनेक उल्लेख आढळतात. प्राचीन काळी प्रसाधन कला जाणणाऱ्या पुरुषांना प्रसाधक व स्त्रियांना प्रसाधिका असे म्हणत. प्रसाधनांची सामग्री ठेवलेल्या पेटीला प्रसाधन पेटीका म्हणत. या पेटीत क्वचित कर्णफूल, कुंडल, तांटक मुक्तातली, हार इ. अलंकारही ठेवीत.

गुप्तकालात प्रसाधन कलेकडे लोकांचे अधिक लक्ष गेले आणि चित्रकला व मूर्तिकला यांतही प्रसाधनांचे चित्रण होऊ लागले. मध्ययुगात तर प्रसाधन कार्य करणाऱ्या स्त्री-पुरुषांचे वर्गच अस्तित्वात आले आणि विविध प्रसाधने करणारे तज्ज्ञही निर्माण झाले. प्रसाधनांची गणना चौसष्ट कलांमध्ये होऊ लागली. स्नानांपभोग, पादुकापभोग, तांबुलोपभोग, वस्त्रोपभोग, माल्योपभोग अशा अनेक अंगांनी प्रसाधनांचा विस्तार झाला.

अशा प्रकारे प्राचीन काळापासून आजपर्यंत भारतीय स्त्री पुरुषांचे प्रसाधन व अलंकार याकडे विशेष लक्ष होते, व अजूनही असते हे कळून येते.

**संदर्भ सूची** :


- प्राचीन भारतीय स्त्री जीवन आणि सौंदर्य प्रसाधने
- भारतीय विश्वकोश - प्रकाशक, महाराष्ट्र राज्य,वाई
- भारतीय संस्कृतिकोश - पं. महादेव शास्त्री जोशी
- याज्ञवल्क्यस्मृती.


**- सौ. स्वाती महेश भालेराव**
जोशी-बेडेकर कला-वाणिज्य महाविद्यालय,
ठाणे.

●●●

जेव्हा देव तुमच्या हातातून काही हिरावून घेतो, तेव्हा त्याच्यावर नाराज होऊ नका. देव फक्त तुमचे हात रिकामे करत असतो. तुम्हाला आणखी काही जास्त देण्यासाठी!

# सुसंवाद (मेडीएशन) काळाची गरज

*माणसामाणसात आज संवाद नाही वास्तविक समाजाची ही मोठी गरज आहे. कारण त्यामुळे अनेक प्रश्न सामंजस्याने सुटतील.*

आजची सामाजिक कौटुंबिक व आर्थिक परिस्थिती लक्षात घेता, असे दिसून येते की, माणूस हा समाजशील कमी पण असमाजशील जास्त झाला आहे. विस्कळीत समाजाची घडी, कुटुंब व्यवस्थेचे बदलते स्वरूप, तडजोड न करण्याची भूमिका, हट्टाला पेटून सूड भावनेने विचार करण्याची पद्धत यांमुळे माणूस निष्कारण न्यायालयाचे उंबरे झिजवताना दिसतो आहे. याचा गंभीर परिणाम सामाजिक स्वास्थावर होताना दिसत आहे.

आपली न्यायप्रणाली स्वातंत्र्यपूर्व काळापासून इंग्रजी कायद्याप्रमाणे भारतामध्ये राबविण्यात आली आहे; तरीही भारतातील अगदी सामान्यातील सामान्य माणसाने त्यामध्ये तेवढाच विश्वास दाखविला आहे. म्हणूनच, भारतातील न्यायव्यवस्था ही स्वतःचे वेगळे अस्तित्व टिकवून लोकांना न्याय देणारी प्रभावी व्यवस्था म्हणून आजही जगात ओळखली जाते. पण स्वातंत्र्यानंतरच्या काळात आपण बघतो की, न्यायालयांवर खटल्यांचा वाढता बोजा आणि न्यायाधीशांची कमतरता यांमुळे त्वरित न्याय मिळणे कठीण झाले आहे. त्याचबरोबर लोकांची सामाजिक, कौटुंबिक जीवनामध्ये समजून न घेण्याची त्यांची भूमिका त्यांना न्यायालयापर्यंत वाद घेऊन येण्यास भाग पाडत आहे.

अशा परिस्थितीत वर्षानुवर्षे तुंबलेले खटले आणि तेवढ्याच प्रमाणात नवीन निर्माण होणारे वाद यांमुळे खटल्याचा निकाल लगेच मिळत नाही. शिवाय आपल्या देशामध्ये सार्वजनिक सुट्ट्या, बंद, दंगल, नैसर्गिक आपत्ती या गोष्टी न्याय उशिरा मिळण्यासाठी कारणीभूत ठरतातच. परंतु अशा परिस्थितीत न्यायव्यवस्था चुकीची आहे असं म्हणून चालणार नाही. 'जस्टीस डिलेड इज जस्टीस डिनाइड' हे तत्त्व आपल्या न्याव्यवस्थेमध्ये बहुतांशी खरे असले तरी, त्याच्या कारणांचा विचार केल्यानंतर लक्षात येते की, यामध्ये समाजाचीही काही जबाबदारी आहे. छोटे-मोठे वाद, कौटुंबिक कलह, भाडेकरूचे वाद, गैरताबेदार, देणी बाकी असलेला ऋणको या स्वरूपाचे दावे प्रचलित न्यायव्यवस्थेकडून सोडविण्याऐवजी समेट आणि सुसंवादाने सोडविले पाहिजेत. परंतु राग, भांडखेरपणा, जिद्द या शुल्लक कारणांमुळे आपण आयुष्यातील प्रेम, आनंद, मैत्री हरवून बसतो आणि आयुष्यातील उमेदीचा काळ न्यायप्रक्रियेत घालवून शेवटी जिंकूनही हरल्याचा आनंद व्यक्त करतो.

यामुळे प्रचलित न्यायप्रकियेऐवजी लोकांनी सुसंवादाने (Mediation) वाद कसे संपुष्टात येतील, जेणे करून दोन्ही पक्षकारांचे नुकसान होणार नाही आणि प्रामुख्याने न्यायवस्थेवरील बोजा कमी होईल, याकडे पर्याय म्हणून बघणे ही आजच्या काळाची गरज आहे. हे ओळखून दिवाणी प्रकिया संहितेच्या कलम-८९ मध्ये दुरुस्ती करणारा कायदा १९९९ मध्ये संमत करून सुसंवाद, समेट व लवाद या स्वरूपाची कायदेशीर यंत्रणा स्थापन करून प्रलंबित दावे या पद्धतीने सामंजस्याने व सौहार्दाने सोडविण्याचे प्रयत्न करण्यात येत आहेत.

एखादा वाद सोडविण्यासाठी 'मध्यस्थी' असणे ही पक्षकाराचीच खाजगी गरज न राहता ती आज कायद्याची अधिकारिता असलेली सर्वमान्य पद्धत झाली आहे.

---

केवळ एक सेकंदाची लढाईसुद्धा तुम्हाला 'चँपियन' बनवू शकते.

मध्यस्थी – ह्या कायद्यानुसार खटल्यातील पक्षकारांना ज्या त्रयस्थ व्यक्तीवर विश्वास आहे व त्याची मध्यस्थी दोघेही मान्य करतात तो मध्यस्थी किंवा सुसंवादी म्हणून काम पाहू शकतो.

यामध्ये या सुसंवादीचे काम खटल्यातील पक्षकारांची मानसिक अवस्था समजून दोघांना योग्य मार्गदर्शन व सल्ला देण्याची जबाबदारी पार पाडावी लागते.

मध्यस्थी एक मित्र – सुसंवादी किंवा मध्यस्थी वादाची परिस्थिती, कारणे हे लक्षात घेवून दोन्ही वादींमध्ये प्रेम व जिव्हाळा कसा निर्माण होईल हा प्रयत्न करत असतो. एकप्रकारे वादींचा तो मित्र, सहचर ही भूमिका पार पाडत असतो. यामध्ये पुढील बाबींचा समावेश होतो.

१) न्यायालयात प्रलंबित असणाऱ्या दाव्यांमध्ये समेट किंवा मध्यस्थी करावयाची असल्यास प्रथम दोन्ही पक्षकारांना या पद्धतीची गरज फायदे-तोटे समजावून सांगण्यात येतात.

२) त्यानंतर दोन्ही पक्षकारांची मध्यस्थीसाठी परवानगी घेऊन मध्यस्थी सोबत पक्षकारांची पहिली बैठक बोलाविली जाते. त्यानंतर दोन, तीन बैठका ज्यामध्ये एक पक्षकाराबरोबर एक अशा बैठकाचे सत्र चालवून त्यांना बोलते करून भांडणाचा मुद्दा, त्याची कारणे समजून घेतली जातात.

३) पुढे सुसंवादी किंवा मध्यस्थी पक्षकारांना चर्चेस पूरक वातावरण निर्माण करून, आपणाला मध्यस्थ म्हणून वादामध्ये रस नसल्याचा विश्वास निर्माण करून देईल.

४) त्यानंतर गरज पडल्यास वादींच्या पुन्हा बैठका घेऊन आपसातील अविश्वास, पूर्वग्रह आणि ताठर भूमिका सोडून देण्यास व समजुतीने सामंजस्याने वर्तन करण्याकडे वळवण्याचा प्रयत्न करेल.

५) वाद संपुष्टात आला तर पक्षकार न्यायालयात अर्ज करून न्यायालयाचा त्याबद्दलचा आदेश मिळवतात.

आज अशा पद्धतीने, वाद निकाली काढणे म्हणजे कुटुंब व्यवस्थेमध्ये आणि समाज व्यवस्थेमध्ये प्रेम, शांती आणि मैत्री वाढविण्यासारखे आहे. कोर्टाचा वेळ, वकीलाची फी, अन्य खर्च यांना छेद देवून पक्षकारांचे स्वास्थ सामाजिक वातावरण सुदृढ होण्यास या पद्धतीमुळे मदत होते. समाजातील जास्तीत जास्त लोकांनी, पक्षकारांनी याचा अवलंब करून आपले वाद सामोपचाराने सामंजस्याने सोडविण्यासाठी या पद्धतीचा वापर करावा एवढीच अपेक्षा.

**– प्रा. एम. डी. बनसोडे**
सहा. प्राध्यापक
वि. प्र. मं. चे ठा.न.पा.
विधी महाविद्यालय ठाणे.

●●●

प्रामाणिकपणे स्वकष्टाने मिळविलेले समाधान, संतुष्टता देणारे, यज्ञ देणारे धन असते. म्हणूनच लक्ष्मीची प्रार्थना करताना म्हटले जाते.

नमस्ते सर्वदेवांना वरदासि हरेः प्रिया।
या गतिः त्वत् प्रसन्नांना सा मे स्यात् तव दर्शनात्।।

''सर्व देवांना वर देणाऱ्या, भगवान विष्णूला प्रिय असणाऱ्या हे देवी लक्ष्मी तुला माझा नमस्कार असो. तू प्रसन्न झाल्यावर जी गती म्हणजे जे स्थान माणसांना प्राप्त होते. ते मलासुद्धा तुझ्या दर्शनाने प्राप्त होवो.''

**– संकलित**

●●●

# साहित्य - जगत

*श्री. शरद जोशी यांनी दिशासाठी आजवर असंख्य पुस्तकांचा परिचय करून दिला आहे. या परिचय मालिकेतील आणखी एक टप्पा - संपादक*

**'कहाणी अथक जिद्दीची' - डॉ. वा. ना. तुंगार यांचे वाचनीय व प्रेरणादायी आत्मकथन**

डॉ. वा. ना. तुंगार, (परेश अपार्टमेंट, पर्वती, पुणे-४११००९) यांचे हे (कहाणी 'अथक जिद्दीची') हे उत्कृष्ट आत्मकथन २६-१२-२०११ रोजी प्रसिद्ध झालेले आहे. (पृ.१७६, मूल्य रु.२००/-) प्रकाशक आहेत. अपंग उद्योग केंद्र, परेश अपार्टमेंटस, पर्वती, पुणे-४११००९ दूरध्वनी क्र. - ०२०-२४४२४९८१) सहप्रकाशक आहेत. सौ. वर्षा पराग पिंपळे (बुकमार्क पब्लिकेशन, १६, सर्वदर्शन, नव स्टॉप, कर्वे रोड, पुणे - ४११००४, फोन नं. ०२० -२५४३०५३२)

**लेखकाचा जीवन परिचय**

एका मध्यमवर्गीय कुटुंबात लेखकाचा जन्म झाला. वयाच्या ८ व्या वर्षी त्यांना पोलिओ झाला आणि अपंगतेनं त्यांना गाठलं. लहानगा वामन एका पायान अपंग झाला, परंतु या ओझ्याखाली खचून न जाता अपंग कल्याण आणि अपंगाचे पुनर्वसन या क्षेत्रांत सर्वस्पर्शी असे काम त्यांनी केले. एका पायाने सायकल चालवून हा लहान वामन कॉलेजात जात असे. शिक्षणाचा खर्च भागवण्याकरिता त्यानं अनेक नोकऱ्या केल्या. पु. ग. सहस्त्रबुद्धे यांच्यासारख्या विद्वानाकडे त्यांनी लेखनिकाचे काम केलं. आपल्या अर्थाजनाकरिता कॉलेजच्या वार्षिकासाठी जाहिराती मिळवणं, परीक्षेच्या काळात सुपरवायझरचं काम करणं असे उद्योग करून त्यानं आपला अभ्यासक्रम पूर्ण केला. पदव्युत्तर शिक्षण घेत असताना काहीवेळा सरकारी नोकरी, काहीवेळेला जनगणनेचं काम असे करत शिकत असताना त्याच्या मनात आलं की, केवळ स्वतःचा विचार न करता समाजातील इतर अपंगांसाठी आपण काम करायला हवं. आपण अपंगांच्या पुनर्वसन क्षेत्रात काम करायला हवं या जाणिवेतून त्याने वानवडी येथे अपंग संस्थेच प्रमुख म्हणून नोकरी केली. संस्था नवीन/ग्रामीण आणि शहरी अपंगाचे प्रश्न अवघड संस्थेसाठी देणग्या मिळवणं अशी धडपड सुरु झाली. परंतु संस्थेमध्ये मतभेद झाले आणि वामनची नोकरी गेली. हा बेकायदेशीर अन्याय दूर करण्यासाठी वामनला कोर्टात जावं लागलं...

मग अणे (पुणे-नगर जिल्ह्यांच्या सीमेवरील एक गाव) नावाच्या गावी दुसरी अपंग संस्था सुरू झालेली होती, तिला मदत करायचं ठरवलं. या निमित्तानं त्याचा समाजकल्याण खात्याशी आणि नंतर मुंबई विद्यापीठाशी संबंध आला. तिथे त्याने समाजशास्त्र विभागात एम.ए. पदवी मिळविली. याकामी त्या वेळच्या समाजखात्याच्या सौ. इंडगुजी व सुप्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ डॉ. शरश्चंद्र गोखले यांनी मोठी मदत केली. त्याच्या (लेखकाच्या) संशोधनाचा आवाका खूपच मोठा होता. थोर समाजशास्त्रज्ञ डॉ. इरावती कर्वे यांनी प्रबंध वाचून त्यांना प्रोत्साहन दिलं...

**हाडाचा कार्यकर्ता**

पुढे समाजजागृती करिता स्वतःचं नियतकालिक हवं म्हणून 'अपंग वार्ता'ची स्थापना केली. अपंगांसाठी तंत्रज्ञानाचा उपयोग, या क्षेत्रातही काम सुरू केल, त्याला भरपूर प्रतिसाद मिळाला त्यांनी अपंगता आणि पुनर्वसनाच्या संपूर्ण क्षितिजाला स्पर्श केला. अपंगतेची व्याख्या, अपंगांच्या सामाजिक संरक्षणसाठी कायद्याची

मैत्रीचे सर्वात उत्कृष्ट स्वरूप म्हणजे तुम्ही कधी एखाद्या कट्ट्यावर एकत्र बसता. एकमेकांशी काहीच बोलत नाही. आणि तरीही तुमचा संवाद पूर्ण झाला असे तुम्हांला वाटते!

गरज, पुनर्वसनाचे ग्रामीण आणि शहरी प्रश्न, लोकजागृतीची गरज या सर्वांचा अभ्यास करून त्यांनी त्या त्या क्षेत्रात आपला ठसा उमटविला. हे कार्य करताना त्यांना अनेक थोर व्यक्तींचे आशीर्वाद व सहाय्य लाभले. अगदी राष्ट्रपती डॉ. कलाम यांनीही पुरस्कार दिला. अनेक सत्कार झाले. एका सत्कारात बोलताना श्री. अण्णा हजारे म्हणाले होते की, अपंगांची सेवा करून त्यांनी एक आदर्श निर्माण केलेला आहे.

**जगावेगळ आत्मचरित्र**

प्रस्तावनेत डॉ. शरश्चंद्र गोखले यांनी त्यांचा मोठा गौरव केला आहे. ते म्हणतात, ''एका अर्थानं हे आत्मचरित्र जगावेगळं आहे. नेहमी आत्मचरित्रात एका व्यक्तीचा आयुष्यात विकास कसा झाला हे सांगितले जाते. या चरित्रात एका महत्वाच्या सामाजिक क्षेत्राचा विकास कसा झाला आणि त्यात या ध्येयवेड्या माणसाचं केवढ मोलं योगदान आहे याचे प्रतिबिंब आहे. (डॉ. हेलन केलर यांची जेव्हा भेट झाली तेव्हा त्यांनी मला सांगितलं होतं 'ध्येयाविना केलेलं काम म्हणजे कंटाळवाणी कटकट, कामाविना ध्येय म्हणजे निव्वळ स्वप्नरंजन आणि ध्येय घेऊन केलेलं काम म्हणजे आयुष्याची सार्थकता. या सार्थक प्रवासाची वाटचाल कशी झाली याचे यथार्थ चित्रण या आत्मचरित्रात आहे.')

**डॉ. कांतिलाल संचेती यांचे प्रचंड सहकार्य**

डॉ. कांतिलाल संचेती या महान समाज कार्यकर्त्याने त्यांना प्रचंड सहकार्य केलं. वा. नां. बरोबर त्यांच्या नेहमी चर्चा होत असत. त्यांच्या वर्कशॉपमध्ये वा. ना. नेहमी जायचे. बांबूचे कॅलिपर्स ते तयार करायचे. वा. ना. अखंड काम करीत असत. त्याचे त्यांना अप्रूप वाटत असे. त्याला 'वा.नां.'च्या पत्नीचं सुनंदाताईंच मोठं सहाय्य मिळत असे, याचेही त्यांना मोठे कौतुक वाटत असे. या तिच्या सहकार्याबद्दल डॉ. संचेती म्हणतात, ''जीवनात स्त्रीचं स्थान जबरदस्त असं असतं. ती तुम्हांला कुठे ही नेऊ शकते.(मी सुद्धा माझ्या सौभाग्यवतीमुळेच उभा आहे) मुलांचं संगोपन करायचं, ते स्त्रीहृदय असलेली आईचं करू शकते. मुलांना सांभाळायचं, वामनरावांना सांभाळायचं साधं काम नाही ते. त्यांना मदतीचा हात देणं, हे सगळंच खूप मोठं काम आहे. त्यामुळेच सौ. सुनंदाला मी वामनइतकेच गुण देईन. किंबहुना त्याच्यापेक्षा एक गुण जास्त देईन. तिच्यामुळेच त्याला इतके काम करता येतंय.''

**लेखकाचं मनोगत**

आपल्या मनोगतात लेखक म्हणतो, ''माझ्या लेखनामध्ये मी करून पाहिलेला आणि यशस्वी झालेला प्रयोग आहे. हा प्रयोग होता अपंग पुनर्वसन कायद्याचे भाषांतर प्रसिद्ध करून पाहण्याचा! या कायद्यांचा अभ्यास करताना सर्वसामान्य अपंग व्यक्ती संस्थामधून काम करणारे शिक्षक आणि अन्य सेवक यांना इंग्रजीत असलेले कायदे समजत नाहीत, अशी एक अडचण माझ्या लक्षात आली. सकाळ, लोकसत्ता, नवाकाळ, या वृत्तपत्रांमधून या कायद्याचे सारांशरूपाने लेख प्रसिद्ध करताच त्याला मोठा प्रतिसाद मिळाला. त्यामुळे हे कायदे मी पुढे पुस्तक रूपाने प्रसिद्ध केले. त्याच्या सहा आवृत्त्या निघाल्या. कायद्याचा पदवीधर नसताना मी केलेला प्रयोग अपेक्षेपेक्षा जास्त यशस्वी झाला.

त्यातून कार्यशाळा, चर्चासत्रे, मार्गदर्शन पर व्याख्यानं असे उपक्रम सुरू झाले. समाजातल्या सर्व स्तरातल्या लोकांशी माझा संपर्क वाढत गेला. गाव पातळीपासून राज्य-राष्ट्रीय पातळीपर्यंत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचे एक घट्ट विणलेलं जाळं माझ्याशी जोडल गेलं...' गेल्या शतकाच्या शेवटच्या दोन दशकांमधील सामाजिक कार्यकर्ते कधी संकटांना डगमगले नाहीत. निरपेक्षपणे काम करणाऱ्या या पिढीनं दुसऱ्यांचे गुण ओळखून त्यांना मोठ केलं. या वृत्तीचे कार्यकर्ते दिवसेदिवस

---

बुद्धिवान लोक आपला वेळ साहित्याचे संशोधन आणि अभ्यासात व्यतीत करतात. पण मूर्ख लोक आळस, झोप आणि भांडणात वेळ घालवतात.

कमी होत आहेत, ही खंत आहे. अपंगांच्या शासकीय योजनांना स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून व्यक्तिगत उत्पनाचं साधन बनविणाऱ्या समाज सेवकांची एक फळी या शतकाच्या प्रारंभीच उदयास येत आहे. राज्यकर्ते काही नोकरशहांच्या सक्रिय सहभागामुळे अशा उद्योगांना खतपाणी घालतात, अशी भावना सर्व सामान्यांच्या मनात रुजलीय. अशा उद्योगांना पायबंद कोणा आणि कसा घालणार यांच उत्तर मला अजूनही सापडलेलं नाही...'' हे सगळं मनोगत मोकळ करत असतानाच माझे अपंग बांधव या आत्मकथनांतून काहीतरी प्रेरणा घेतील, उमेद घेतील आणि उत्साहाने आपली प्रगतीची यशस्वी वाटचाल करतील अशी आशा आणि विश्वासही मी आवर्जून व्यक्त करतो.'

**संघर्षशील जीवनगाथा**

एकंदर १५ प्रकरणांतून आपली जीवनगाथा त्यांनी मोकळेपणाने सांगितली आहे. भारतामधल्या मोठमोठ्या धुरीणांनी त्यांना केलेली मदत, त्यांनी केलेले राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय पातळीवर केलेले कार्य, हे करत असताना जे कष्ट पडले ते विनासायास भोगले इ.इ. माहिती सविस्तरपणे त्यांनी सांगितली आहे. या सर्व कामांत त्यांच्या आजीने मोलाचा संदेश दिला (शरीराने अपंग असलास तरी मन कणखर बनव, पायानं चालण्यापेक्षा डोक्याने जो चालतो, तोच खऱ्या अर्थाने यशस्वी होते.) त्यामुळे पुस्तक मोठे वाचनीय झाले आहे. मुळातूनच ते प्रत्येकाने वाचावे असे सुचवावेसे वाटते. जवळ जवळ सात दशकापूर्वी सुरू झालेली ही कहाणी चार मुलासारख्या हसत खेळत वाढणारा एक मुलगा अचानक पोलिओने डावा पाय त्याच्या शरीरातून वजा होतो. जणू एका वाजाबाकीच्या जगातच त्याची रवानगी होते. मात्र या मुलाची शिक्षिका असलेली आजीच त्या मुलाचं छायाछत्र होऊन वर उल्लेखिलेला, मोलाचा संदेश देते. हा मोलाचा संदेश देताना आजी पुढे म्हणते, ''स्वतःसाठी जगलास तर संपलास, दुसऱ्यासाठी झिजलास तर जगलास.'' आजीच्या ह्या प्रेरणेची शिदोरी घेऊन मग सुरू होते, या मुलाची एक प्रदीर्घ, संघर्षशील शिक्षण यात्रा...डॉ. वा. ना. तुंगार यांचे हे आत्मकथन म्हणजे कहाणी. स्वतःच्या अपंगत्वावर चिकाटीनं मात केल्याची...स्वतःबरोबरच अन्य अपंग बांधवांना आशावादानं पुढे नेणाऱ्या प्रेरणेची ही कहाणी एका ज्ञानमार्गी, निरलस सामाजिक कार्यकर्त्याची...खडतर चिवट संघर्षाची सकारात्मकतेतल्या सामर्थ्याची, प्रयत्नवादाची, उदात्त ध्येयांची स्वप्नांची आणि माणसातल्या माणूसपणालाही जाग आणणारी आहे. वाचक हो, 'कहाणी अथक जिद्दीची' ही जिद्दीची कहाणी अवश्य वाचा, तुमच्या जवळपासच्या मित्रांना, ग्रंथालयांना संग्रही ठेवण्याची शिफारस करा. डॉ. वा. ना. तुंगार यांना शतशः धन्यवाद.

**चला, शिकू या हार्मोनियम!**

हे पुस्तक श्री. वसंत देशपांडे बी-२०३, आनंदवन सोसा. आनंद पार्क, ठाणे-प-४००६०१ (मो.९९६९६२२४०१) यांनी लिहिले आहे व नीलेश गायकवाड व्यास क्रिएशन्स डी/४ सामंत ब्लॉक्स, घंटाळी पथ नौपाडा ठाणे (प)-४००६०२ (मो.:९९६७६७८३९५१०) यांनी ते प्रकाशित केले आहे. (पृ.६४, मूल्य ७५/-)

श्री. देशपांडे यांनी संगीत शास्त्र व संगीत विषयाचे शिक्षण कोणत्याही संस्थेकडून वा कोणत्याही गुरुकडून घेतलेले नसतांना 'चला, शिकू या हार्मोनियम' हे पुस्तक लिहिले आहे. मात्र त्यांनी संगीत शास्त्रावरील बरीच पुस्तके वाचून, ती संकलित करून किंवा त्यातील माहितीच्या आधारे हे पुस्तक लिहिले आहे. हार्मोनियम नव्याने शिकणाऱ्यांना हे नक्कीच उपयुक्त होईल असा त्यांना विश्वास वाटतो. प्रस्तावनेत संगीत अलंकार प्रकाश चिटणीस (हार्मोनियम वादक) म्हणतात,' या पुस्तकाचे

वेगळेपण हे की त्यांनी गाण्यांची नोटेशन्स लिहिली नसून, गाण्यांचे स्वर, गाण्याचा 'सा' कसा ओळखावा किंवा हार्मोनियमच्या पट्टयांवर बोटे कशी ठेवावीत हे अभ्यासपूर्वक लिहिले आहे. हार्मोनियमच्या पट्टयांवर बोटे कशी ठेवावीत हे अभ्यासपूर्वक लिहिले आहे. हार्मोनियम नव्याने शिकणाऱ्यांना या पुस्तकाचा निश्चित उपयोग होईल. सर्व सामान्य लोकांना ही माहिती निश्चित उद्‌बोधक वाटेल व त्यांच्या ज्ञानात भर पडले. त्यामुळे समाजात संगीताचा प्रचार होऊन चांगले श्रोतेही निर्माण होतील.

**संदर्भ पुस्तकांची सूची**

या पुस्तकात दिली आहे. त्यांतील काही पुस्तके अशी – 'हार्मोनियम गाईड' – कै. श्री. गुरुजी भास्कर गणेश, भिडे इंदूरकर, संवादिनी – डॉ. श्यामकांन्त मोडक, डहाणू, 'राग' आणि 'भारतीय संगीताचे सामान्यज्ञान व स्वरज्ञानासाठी शुद्ध-स्वर अलंकार, ही दोन पुस्तके-किरण फाटक, रागाच्या परिघातून केंद्र बिंदूकडे – ले. किरण फाटक, 'वाद्यवादनाचे संपूर्ण गाईड' आणि 'संगीत शास्त्राचे गाईड' ही दोन पुस्तके पं. अरविंद गजेन्द्र गडकर यांनी लिहिली आहेत.

**श्री. देशपांडे यांचे इतर लेखन**

श्री. वसंत देशपांडे यांनी यापूर्वी वेगवेगळ्या विषयावर ४ पुस्तके लिहिली आहेत. ती अशी 'चला जाऊ या लंडनला', 'खुणावणारे लिखाण' आणि 'न सरणाऱ्या आठवणी','मध्यरात्रीचा तो चंद्र व हसरे आकाश'. श्री देशपांडे यांचे अभिनंदन!

**श्री. शरद जोशी (ग्रंथ प्रसारक)**
५, अमर कल्पतरू सोसायटी,
देवी चौक, शास्त्रीनगर,
डोंबिवली – ४२१२०२
दूरध्वनी : ९५२५१२-४८६९६७

●●●

## *'हाडां'ची माहिती*

- जन्मतःच आपल्या शरीरात ३०० हून अधिक हाडे असतात. वाढीच्या प्रक्रियेत काही हाडे जुळून येतात आणि पूर्ण वाढ झालेल्या शरीरात २०६ हाडे व ३२ दात असतात.
- मानवी हातांमध्ये २७ हाडे असतात. तर, चेहऱ्यात १४!
- मानवी शरीरातील सर्वात लांबलचक हाड हे मांडीत असते. 'फीमर' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या हाडाची लांबी त्या व्यक्तीच्या उंचीच्या एक चतुर्थांश एवढी असते.
- मानवी शरीरातील सर्वांत लहान हाड कानाच्या आतील बाजूस असते. रिकिबीच्या आकाराचे हे हाड एक दशांश इंज एवढे लहान असते.?
- मानवी शरीरात पूर्ण किंवा अर्धवट हलविता येणारे असे एकूण २३० सांधे असतात.
- हाडे शरीराला आधार देतात आणि स्नायूंसोबत शरीराच्या हालचालींना मदतही करतात. हाडे नसती तर मानवी शरीर म्हणजे नुसता एक गोळा बनून राहिले असते.
- कोलॅजेन नावाचे प्राचीन आणि कॅल्शियम फॉस्फेट या दोन रसायनांनी हाडे बनतात. कोलॅजेन मऊसर आणि कॅल्शियम फॉस्फेट अतिशय टणक असते. त्यामुळे हाडे दणकट आणि लवचिक बनतात.
- हाडांत पाणी, क्षर आणि सातत्याने वाढ होत असलेल्या काही पेशीही असतात.

**– संकलित**

●●●

# श्रीमत् भगवद् गीता - अध्याय बारावा
## विषय : भक्तियोग

*कै. शंकरराव मठांनी दिशासाठी दिलेल्या लेखमालेतील हा १२ व्या अध्यायावरील लेख. या लेखाच्या माध्यमातून कै. मठांना आम्ही विनम्र अभिवादन करतो. - संपादक*

**श्लोक १ ते १२ – साकार निराकार उपासना, कोणते निर्णय श्रेष्ठ याचा निर्णय**

अर्जुन म्हणाला – हे भगवंता सतत योग करणारे तुझे जे भक्त तुझी साकार रूपाने उपासना करतात आणि जे अव्यक्त अविनाशी आत्मरूपाची उपासना करतात त्यात कोणते ते योगी अधिक श्रेष्ठ आहेत?

भगवान म्हणतात – हे अर्जुना, माझ्या व्यक्त रूपाच्या ठिकाणी मन लावून नित्य योग करीत श्रेष्ठ श्रद्धेने जे माझी सगुणरूपात उपासना करतात, ते योगी श्रेष्ठ होत.

जे सर्व प्राण्यांच्या हितार्थ तत्पर असून सर्वत्र समबुद्धी ठेवीत, सर्व इंद्रियांचा संयम करून अव्यक्त, अर्चित्य, अवर्णनीय, सर्वव्यापक सर्वातीत, अचंचल स्थिर आणि अविनाशी स्वरूपाची उपासना करतात ते मलाच येऊन मिळतात. अव्यक्तावर ज्यांचे चित्त लागले आहे, त्यांना फार कष्ट होतात. कारण देह धारण केलेल्यांना अव्यक्ताची प्राप्ती फारच कष्टाने होते.

जे माझ्या विषयी तत्पर होऊन, सर्व कर्मे मला अर्पण करतात, ध्यान करतात, ते अनन्य योगाने माझीच उपासना करतात. हे पार्था माझ्या ठिकाणीच ज्यांचे चित्त लागलेले असते त्यांचा मृत्युरूपी संसारसागरातून मी उद्धार करतो. करता माझ्या ठिकाणीच मन ठेव, माझ्या ठिकाणी बुद्धी स्थिर कर; असे केल्याने तू या नंतर माझ्या ठिकाणीच निवास करशील यात काही सुद्धा संशय नाही.

हे धनंजया, तू जर माझ्या ठिकाणी तुझे चित्त स्थिर करण्यास असमर्थ असशील, तर अभ्यास योगाच्या द्वारे मला प्राप्त करण्याची इच्छा कर. जर तू असा अभ्यास करण्यासही असमर्थ असशील तर निदान माझ्यासाठी कर्म करण्यास तरी तत्पर रहा, माझ्या प्रीत्यर्थ कर्म करण्याने देखील तू सिद्धि मिळवशील आणि जर हेही करावयास तू असमर्थ असशील तर आत्म संयमाच्याद्वारे माझ्या योगाचा अभ्यास करून सर्व कर्माच्या फळांचा त्याग कर.

अभ्यास योगापेक्षा ज्ञानयोग अधिक श्रेयस्कर, ज्ञानयोगापेक्षा ध्यान योग अधिक श्रेयस्कर, ध्यान योगापेक्षा कर्म फळ त्यागाची विशेषता अधिक आहे व शेवटी या कर्म फळ त्यागाने लवकरच शांती प्राप्त होते.

**श्लोक १३ ते २० भक्ताची लक्षणे**

सर्व प्राण्यांचा द्वेष न करणारा, सर्वांचा मित्र, दयावान् ममत्व रहित, घमेंड न बाळगणारा सुखदु:ख सारखे मानणारा क्षमाशील, सदा संतुष्ट, योगाभ्यास करणारा, संयमी, दृष्ट निश्चयी असा जो आहे आणि ज्याने आपले मन आणि बुद्धी मला अर्पण केली आहेत. तो माझा भक्त मला प्रिय आहे. जो भक्त इच्छा रहित, पवित्र, दक्ष, उदासीन, व्यथा रहित आणि काम न करणारा आहे तो मला प्रिय आहे, जो हर्ष मानत नाही आणि द्वेष करीत नाही, जो शोक आणि आशाही करीत नाही, जो शुभ आणि अशुभ दोघांचाही त्याग करतो असा जो भक्त, तो मला प्रिय आहे. जो शत्रू आणि मित्र, मान आणि अपमान, शीत आणि उष्ण, सुख आणि दु:ख यांच्या विषयी समभाव धारण करतो, जो भोगावर आसक्ती ठेवीत नाही जो निंदा आणि स्तुती यांविषयी समभाव ठेवतो, जो मौन धारण करतो, मिळेल

त्यातच जो संतुष्ट असतो, ज्याचे स्वत:चे स्थान नाही, ज्याची बुद्धी स्थिर आहे असा जो भक्त, तो मला प्रिय आहे. जे श्रद्धा ठेवणारे आणि मला परमश्रेष्ठ मानणारे भक्त येथे सांगितल्याप्रमाणे अमर ज्ञानाचं सेवन करतात ते मला अत्यंत प्रिय होतात.

अकराव्या अध्यायात अर्जुनाला विश्वरूपाचे दर्शन घडले. ते सगुण साकार अखंड असे रूप पाहून परमेश्वराची सेवा करावी याचा विचार त्याच्या मनात घोळू लागला. त्याची अव्यक्त रूपात सेवा करावी का विराट अशा सगुण रूपात सेवा करावी? अव्यक्त उपासना श्रेष्ठ की व्यक्त उपासना श्रेष्ठ, अशी शंका त्याच्या ठिकाणी उत्पन झाली. कारण अव्यक्त अविनाशी आणि व्यक्त विनाशी तत्त्वाच्या उपासनेने अविनाशी तत्व कसे प्राप्त करून घेता येईल? सुरुवातीलाच अर्जुनाच्या या प्रश्नासंबंधीचा विचार करण्यात आला आहे.



श्रीकृष्ण म्हणतो, अर्जुना जे ध्यान करतात व माझ्या ठिकाणी मन लावून श्रद्धापूर्वक माझी उपासना करतात त्यांना मी श्रेष्ठ योगी समजतो आणि जे सर्व इंद्रियांचे संयमन करून सर्वत्र समबुद्धी ठेवून जे दृढ, अचल, सर्वव्यापी, अव्यक्त, अविनाशी, स्वरूपाची उपासना करतात त्यांना कष्ट अधिक होतात. देहधारी मनुष्याला अव्यक्ताची गति कष्टानेच प्राप्त होते. थोडक्यात श्रद्धेने सगुण साकाराची उपासना करतात ते श्रेष्ठ भक्त होत. अव्यक्ताची उपासना करणारेही ईश्वराला प्राप्त होतात. पण त्यांना फारच कष्ट पडतात. हा मार्ग दुर्गम आहे.

मयि आवेश्य मनो ये मां नित्य युक्ता उपासते। माझ्या ठिकाणी मन लावून जे उपासना करतात असे म्हटले आहे ते सगुण रूपावर मन लावणे या संदर्भात आहे. ही विभूति पूजा मयि वासुदेवे इत्यर्थः। अगर विश्वरूप पूजा आहे कारण वासुदेवः सर्व इति। हा भाव गीतेत व्यक्त करण्यात आला आहे. वृष्णीनीवासुदेवोऽस्मि। या उक्तीप्रमाणे श्रीकृष्णाचे अनुयायित्व पत्करून त्याच्या उपदेशाप्रमाणे चालणे होय.

सांप्रत भक्ती ही प्राचीन काळच्या एखाद्या विभूतीची वा मूर्तीची केली जाते. प्रत्यक्ष कोणत्या जिवंत विभूतीची नाही. गीता कालीन विभूति पूजेत व सांप्रतच्या भक्तीत हे अंतर आहे. मूर्ती पूजेला उपासनेत स्थान आहे. परंतु गीतेत मूर्तिपूजेपेक्षाही जिवंत वीरांना उपास्य मानले आहे. दहाव्या अध्यायातील विभूति योगात याची अनेक उदाहरणे आहेत. मुनीनां व्यास, पांडवांना धनंजयः, वृष्णीनां वासुदेवः, या विभूती भगवान श्रीकृष्णाच्यावेळी विद्यमान होत्या. इतकेच नव्हे, प्रत्यक्ष कर्मशील होत्या. प्रत्यक्ष दिसणाऱ्या ईश्वर स्वरूप विभूतीची उपासना करणे म्हणजे त्यांच्यापाशी जाणे, त्यांचा उपदेश ऐकणे, त्यांच्या आदेशाप्रमाणे वागणे,

त्यांच्या प्रीत्यर्थ कर्म करणे त्यांच्यासाठी आत्मसमर्पण करणे ही त्या काळची सगुण उपासना होती. जनतेच्या कोणत्याही भागाचे कष्ट दूर करून आपले जीवन व्यतीत करण्याने आपल्या कर्माने ईश्वरोपासना होत आहे असे अनुभविणे ही देखील सगुण उपासनाच होय. फार प्राचीन काळापासून अशा प्रकारे सगुण उपासना केली जात आहे. श्री हनुमंतानी प्रभू रामरायाची केलेली उपासना ही अशा प्रकारची जिवंत विभूति उपासना होय. या सगुण उपासनेत उपासकाराने उपास्या प्रीत्यर्थ कष्ट सहन केले. उपास्यांचे कार्य केले. त्याच्यासाठी आत्म समर्पण केले. या संदर्भात लक्ष्मणांनी केलेले आत्मसमर्पण अपूर्व आहे ही प्रत्यक्ष विभूति उपासना होय.

याचसाठी गीतेत प्रत्यक्ष दिसणाऱ्या उपास्य विभूतिंची नामावली दिली आहे. आदित्यानां विष्णुः । ज्योतिषां रविः । पवतांपवनः । वसूनां पावकः । नक्षत्राणां शशी । स्थावराणां हिमालयः । सर्व वृक्षांना अश्वत्थः । स्नोतसां जान्हवी । सरसां सागरः । इत्यादि वासुदेव, अर्जुन, व्यास, राष्ट्राचा राजा या विभूति त्याकाळी विद्यमान होत्या. प्रजाजनांना उपास्य म्हणून उपयुक्त झाल्या.थोडक्यात जिवंत आदर्शांची मालिका उपासकांना जास्त प्रेरणा देते व त्यातून त्यांना मार्गदर्शन प्राप्त होते व सर्व वस्तूत श्रेष्ठ असणाऱ्या वस्तूच्या ठिकाणी उपासकाचा आदर दुणावतो. यात गुण, रूप, विद्या आदि विभूतींचा समावेश होतो. या विभूति मनुष्याला सहायक आहेत. मनुष्याला प्राप्त होणाऱ्या आहेत व त्याच्याद्वारे मनुष्य आपली उन्नती करून घेऊ शकतो.

विभूति उपासनेत गीतेला प्रत्यक्ष सेवा अपेक्षित आहे. केवळ आरती, पूजा, अर्चा याला सगुण उपासना असे सांप्रत आपण म्हणत आहोत. आणि सेवा, जनहित, ईश्वरीय कार्य अन्यायाविरुद्ध संरक्षण या गोष्टी उपासनेशी संबंधित नसल्याचा आपला समज झाला आहे. प्राचीन विभूति व वीर पूजनातून स्फुरण प्राप्त होत असे हा फायदा सांप्रतच्या मूर्ती पूजेतून होतो. गीतेतील सगुण उपासना म्हणजे प्रत्यक्ष ईश्वराची उपासना जिवंत विभूतीची, जिवंत वीरांची आणि विश्वरूपाच्या कोणत्याही जिवंत भागाची उपासना होय. ती प्रत्यक्ष फलदायी आहे. उपास्य व उपासक यांचे संबध जडतात. त्यातून योग्य तो बोध, उपदेश उपासकाला प्राप्त होतो, असा जिवंत जागृत संबंध या उपासनेत गीतेला अभिप्रेत आहे.

प्राचीन काळच्या आदर्शावरून सांप्रतकाळी कोण आदर्श आहे याचा विचार करून तुलनात्मक शोध घेणे योग्य ठरेल. वर्तमान काळी जिवंत आदर्श कमी होत चाललेत. ही खेदाची गोष्ट आहे. इतकंच नव्हे आज सगुण उपासनेचा व्यवहार साधनाने परमार्थ साधन घडणे दुरापास्त झाले आहे. प्राचीन विभूतिचेही उपासना स्वरूप केवळ पूजा, अर्चा, आरती, नमस्कार, प्रसाद या पुरतेच मर्यादित झाले आहे. कोणत्या गोष्टीवर भर द्यावा व योग्य पद्धतीने सगुणोपासना करावी याचा पुनर्विचार झाल्यास ते किफायतशीर झाल्यावाचून राहणार नाही.

**नामजप** – सगुण उपासनेत कोणत्याही मूर्तीची पूजा, नामजप या गोष्टी येतात. मंदिरे बांधणे, मूर्ती स्थापना करणे, पूजा अर्चा करणे, त्याच्या नावाचा जप करणे हे प्रकार सध्या प्रचलित आहेत. विभूति वर्णनात यज्ञानां जप यज्ञोऽस्मि । असा उल्लेख आहे. यात जपाला मोठे स्थान देण्यात आले आहे. जप हा विभूतीच्या नावांचा, एखाद्या मंत्राचा, अगर एखाद्या उच्च विचाराचा असू शकतो. मनाला स्वाधीन करण्यासाठी याचा अत्यंत उपयोग आहे. कोणत्याही नामाचा चप करण्याने मनाला अभौतिक अवस्था प्राप्त होते. हा जप सुलभ साध्य असल्याने यात कोणीही भाग घेऊ शकतो आणि अपूर्व आनंद मिळवू शकतो.

**त्रिगुणात्मक प्रकृतीत ईश्वराची अभिव्यक्ती** – ईश्वर, सत्व, रज, तमात्मक अष्टधा प्रकृतीत साकारतेने प्रकट

आपल्याला ज्या गोष्टीचे भय वाटते तिच्याशी सामना करण्याची सवय असेल, तर ताणाचा प्रश्नच येत नाही.

झालेला आहे. तीच त्याची सगुण मूर्ती होय. त्याचीच उपासना करणे, याला सगुण उपासना असे म्हणतात. भूतहिते रतः सर्व प्राण्यांचे हित करणे याचेच नाव ईश्वाची उपासना, हा गीतेचा उपदेश सर्वश्रेष्ठ आहे. कोणत्याही विभूतीच्या ठिकाणी आपले मन स्थिर करावे. हे जमले नाहीतर मन स्थिर करण्याचा अभ्यास करावा, असे करण्याने कठीण गोष्टही सुलभ होते. सतत अभ्यास व जमल्यास सर्व कार्ये ईश्वराला अर्पण करावीत. त्यामुळे अंतःकरणाची शुद्धी होते. अर्पण जमत नसल्यास आपल्या कर्माची फळे जनकल्याणासाठी अर्पिते करावीत. त्यागानेही मनुष्याचा उद्धार होते. ज्ञानमार्गापेक्षा, ध्यानमार्ग सोपा, ध्यानापेक्षा अभ्यास सोपा, अभ्यासापेक्षा कर्मयोग सुलभ त्याहीपेक्षा कर्मफळ त्याग सुगम; त्याने शांती मिळते.

**श्रेष्ठ भक्तांची लक्षणे** – ही लक्षणे आणि पुढील १६ व्या अध्यायातील दैवी संपत्तीची लक्षणे बरीचशी सारखी आहेत. तसेच दुसऱ्या अध्यायातील स्थितप्रज्ञाची लक्षणे यांतही बरेच साम्य आढळते. थोडक्यात ज्ञानी, गुणातीत, श्रेष्ठभक्त या सर्वांची लक्षणे सारखी असतात. कारण मार्ग वेगळे असले तरी अंतिम साध्य हे एकच आहे. हीच गीतेची शिकवण आहे.

**अद्वेष्टा** – परस्पर द्वेषापेक्षा परस्पर प्रेमाने वागण्याने अधिक सुख प्राप्त होते. संपूर्ण प्राणिमात्रांचा द्वेष न करण्याचा आदेश गीता देत आहे. अद्वेष्टा सर्व भूतानां। समाजातील सर्व घटक परस्परांशी प्रेमाने वागल्यास, एक आदर्श समाज म्हणून सुखाने नांदता येईल.

**मैत्र व करुण** – प्रत्येक व्यक्ती आपल्या मुलाबाळांवर दया करते व प्रेमदृष्टी ठेवते. सर्वच मुलाबाळांवर अशी दृष्टी ठेवावी असे गीता संगते. सर्व प्राणिमात्रांशी दया व मित्र या दृष्टीने वर्तन व्हावे. करुण भावाला जाती, धर्म इत्यादींची मर्यादा नाही. सर्व माणसात ही दृष्टी यावी या प्रकारचे शिक्षण देणे आवश्यक.

**निर्णय** – ममत्व त्याग, हेही वैयक्तिक व सामुदायिक व्यवहारात आणण्याजोगे आहेत. हे माझे, हे माझे नव्हे अशा प्रकारचा भाव नाहीसा होणे, म्हणजेच निर्माण होणे होय. यामुळे द्वेष बुद्धी कमी होते.

**अनिकेत** – धन दौलत, जमीन, घर ज्या गोष्टीवर आपले ममत्व चिकटते अशा वस्तू याला निकेत म्हणतात. या कोणत्याही गोष्टी नसाव्यात, असे वाटणे याला अनिकेत म्हणतात. निर्मत झाल्यासच ही गोष्ट संभवते. यात संन्यासी, यति, बुद्धभिक्षु या जीवन पद्धतीने जगणारे लोक मोडतात. ही मंडळी पूर्व काळी खऱ्या अर्थाने अनिकेत होती. आज पतित काळात या जीवन पद्धतीचेही अवमूलन झाले आहे.

**निरहंकार** – अहंकार, गर्व, घमेंड नसणे. अहंकारामुळे ममत्व, ममत्वामुळे अनेकांचा द्वेष अशी मालिका आहे. हे ओळखून अहंकार सोडण्याचा प्रयत्न करावा.

**संतुष्ट** – नेहमी संतुष्ट राहिले पाहिजे. जे मिळेल त्यात समाधानी रहावे. असंतोषामुळे द्वेष, भांडणे होतात. समाधानाने भोग लालसा मर्यादित राहते. संतुष्टो येन केनचित्।

**अनपेक्षः** – सुख भोगाची इच्छा अशा असू नये. भोगेच्छा जितकी कमी होईल तेवढी करावी. भोगलालसा वाढल्यास समाधान नष्ट होते.

**यतात्मा** – आत्मसंयमामुळेच संतोष वृत्ती वाढते. अन्यथा भोगच्या इच्छा प्रबळ होतात. असंयमाने सुखही लाभत नाही. म्हणून संयमाचे अवलंबन करणे अप्रित आवश्यक.

**समभाव** – समबुद्धी समभाव समदृष्टी सर्वत्र ठेविली पाहिजे. सुख दुःख आदी द्वंद्वाच्या बाबतीत मनाची समवृत्ती ठेविली पाहिजे. सुख वा दुःख प्राप्त होवो आपल्या कर्तव्यापासून केव्हाही परावृत्त होऊ नये. कर्तव्य पालनात द्वंद्वामुळे अडथळा निर्माण होणार नाही, हे पाहणे आवश्यक

आपणच स्वतःशी विचार करत राहिलो, तर किरकोळ गोष्टीसुद्धा प्रचंड वाटायला लागतात.

आहे. समबुद्धीने द्वंद्व आघात सहन करता येतात. यासाठी समभावाचा आग्रह.

**दृढनिश्चय** – दृढनिश्चयाने समवृत्ती ठेवता येते. वृत्ती विचलित होऊ लागल्यास, दृढ निश्चयाने ती स्थिर करता येते.

**स्थिरमति** – स्थिर बुद्धी मनुष्यास अत्यंत आवश्यक, चंचल बुद्धीचा माणूस कोणतेही काम पूर्ण करू शकत नाही.

**संगवर्जित** – भोगासक्ती सोडल्यास, संयमवृत्ती अवलंबनाने बुद्धी स्थिर होते. भोगलालसा उन्नतीला बाधक.

**हर्ष शोकापासून मुक्त** – यांच्या आघातापासून पराजित न होणारा साधकच मुक्त होऊ शकतो.

**शुभ अशुभ दोहोंचा त्याग** – शुभ वा अशुभ कर्मात आसक्ती न ठेवणे, अशुभ कर्मत्याग सहज शुभ कर्मात मन रेंगाळते. दोहोंपासून अलिप्त राहण्याने खरे समाधान प्राप्त होते.

**उदासीन** – निःपक्षपणे व्यवहार करणे.

**शुद्धी** – जीवन शुद्ध, पवित्र, निर्मळ निष्कलंक असावे असा निश्चय करून तसे वागणे.

**दक्ष** – प्रत्येक कर्तव्य दक्षतेने करणे, म्हणजे चुका होत नाहीत.

**सर्वारंभ परिषणी** – संपूर्ण सकाम कर्मांचा त्याग करणारा, निष्काम कर्मयोगाचे आचरण करणारा. लोकांना त्रास न देणारा, लोकांच्या त्रासाने जो व्यथित होत नाही असा चित्त मन बुद्धी सर्व काही ईश्वराच्या ठायी अर्पण करून टाकणारा असा योगी क्षमाशील क्षमा करणारा व कष्ट उठविण्यास सक्षम असणारा या साऱ्या गोष्टी आचरणात आणणारा तो सर्व श्रेष्ठ व श्रद्धायुक्त भक्त होय. ही थोडक्यात भक्तीची लक्षणे आहेत. यांतील जितका भाग आपल्या जीवनात आणता येईल त्या प्रमाणात आपल्या जीवनाला एक विशिष्ट वळण लागेल. असा प्रयत्न करण्याचे ठरविल्यास जीवनमान सुधारेल.

**कै. शं. बा. मठ**

●●●

### *ब्रह्मकमळ*

ब्रह्मकमळ हे उत्तराखंडाचे राज्य फूल आहे. हिमालयीन प्रदेशात हिमालयाचा भारतातील भाग, उत्तर बर्मा व दक्षिण, पश्चिम चीन अशा विशिष्ट प्रदेशात हे फूल सापडते. ही वनस्पती समुद्र सपाटीपासून ३ ते ४००० मीटर उंचीवर पसरलेली आहे. याची सर्वसाधारण उंची ५ ते १० से.मीटर असते. मध्य पावसाळ्यात म्हणजे जुलै-ऑगस्ट महिन्यात या फुलाचा बहरण्याचा काळ असतो. या दरम्यात ते खडक व डोंगर कपारीवर गवतात आढळते.

या फुलाला धार्मिक महत्त्व असल्याने ते बद्रीनाथला विष्णूला वाहिले जाते. केदार नाथकडे शंकराला वाहिले जाते. सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये येणाऱ्या नंदाष्टमीला हे फूल देवळांमध्ये प्रसाद म्हणून व हिंदू पुराणानुसार हे फूल शंकराच्या मदतीने ब्रह्माने निर्माण केले व गणपतीच्या शिरावर वाहिले जाते.

संदर्भ : करंट सायन्स, खंड.१०४, क्र.६-२५ मार्च २०१३ पृ. ६८५

●●●

# नर्मदा परिक्रमा

**भाग : १**

*नर्मदा परिक्रमा हे एक आव्हानच असते.* खूप जुने वाचक, लेखक व हितचिंतक *श्री. अरविंद ओक यांनी या परिक्रमेचा अनुभव घेतला. नर्मदा नदीसारख्या पवित्र नदीच्या काठी नास्तिक माणूसही नर्मदेला 'मैय्या' म्हणतो, तिच्या प्रती आत्मीयता जागी होते. श्री. ओक यांच्या प्रवासी दैनंदिनीतील हा संपादित भाग – संपादक*

**लेखकाचे मनोगत**

लहानपणापासून साधू जीवनाबद्दल मला औत्स्युक्य होते. मोठे झाल्यावर वाटायचे की रेल्वेने दिल्लीला जावे आणि गावागावांतून पायी प्रवास करत, वाटेत भिक्षां दे हि करत, गावातील मंदिरांमध्ये मुक्काम करीत सहा आठ महिन्यांनी महाराष्ट्र गाठून घरी परतावे.

असे मी केले असते की नाही, सांगता येत नाही परंतु नर्मदा परिक्रमेच्या निमित्ताने ती इच्छा पूर्ण झाली हे मात्र खरे!

पूर्वेला उगम पावून पश्चिम वाहिनी ही नर्मदा नदी गुजराथमध्ये अंकलेश्वरपाशी समुद्राला मिळते. प्राचीन काळापासून परिक्रमा उपक्रम सुरु आहे. ज्ञात इतिहासात मार्कण्डेय ऋषींनी आपल्या शिष्यांसह ही परिक्रमा केली तिला २७ वर्षे लागली. या नदीला ९९९ उपनद्या येऊन मिळतात. यांपैकी कोणती ही नदी मार्कण्डेय ऋषींनी ओलांडली नाही. याचा अर्थ मिळणाऱ्या प्रत्येक नदीकाठाने ते पायी चालत, वाटेत वसलेल्या गावांमधून सांस्कृतिक, अध्यात्मिक कार्य करीत, सर्व मानव पुंजाना ते भेटत भेटत उगमाला फेरी मारून, पलिकडील काठाने पुन्हा नर्मदा तीर गाठत, आताची एकूण परिक्रमा ३०० कि.मी.ची आहे.

अध्यात्मिक अनुभव मिळविणे, आहेत ते वाटत जाणे आणि पूर्णपणे ईश्वरावर रोजचा योगक्षेम सोडून, जीवन संपन्नतेसाठी नर्मदेला पायी फेरी मारणे हा प्रदक्षिणेचा मूळ हेतू.

शेकडो हजारो वर्षांपूर्वी, नुसत्या नर्मदेभोवती प्रदक्षिणा करणे सुद्धा अतिशय कसोटीचे असावे. आजही घनदाट अरण्यातून प्रवास करावा लागतो. उथळ प्रवाह (उपनद्या) पायी पार करता येतात परंतु खोल प्रवाहापाशी डोंगी (अगदी अरुंद होडी) किंवा होडी उपलब्ध असते.

नर्मदे काठचा प्रत्येक जण, विशेषतः शेतकरी अतिशय समाधानी दिसला. देण्याची वृत्ती प्रत्येकात दिसली. आर्थिक परिस्थितीचा याच्याशी काही संबंध नसायचा. बाराही महिने शेतकरी पिके घेतात आणि प्रत्येकाच्या मनात नर्मदामैय्याविषयी अतीव कृतज्ञतेची भावना असते.

नर्मदातीरी महादेवाची अनेक लहान मोठी मंदिरे आहेत. 'तेरे जलका हरेक कंकर, पूजा जाता बनके शंकर' अशा यर्थाचे वचन नर्मदेमधील गोट्यांबाबतीत अक्षरशः सत्य आहे.

नर्मदाकिनारी जे आश्रम आहेत, त्यांत बव्हंशी पारंपरिक आणि कर्मकाण्डी भक्ती आढळली. अध्यात्मिक विकास त्यातून होत नाही. राज–राजेश्वरी मंदिरातील एकच साधु असे भेटले की तिथे पाठशाळा, शाळा, वसतिगृह हे सारे मंदिरात चालते.

असा एक एक आश्रम जर खऱ्या अर्थाने कार्य करेल, तर त्या पूर्ण गावाचा आध्यात्मिक व सांस्कृतिक विकास होईल हे नक्की.

भेटलेले ८०% साधु चरसी होते. अध्यात्मिक संबंध

आयुष्याची नौका पार करत असताना तुफानांना टाळू नका. शांत समुद्र कधीच कुशल खलाशी बनवू शकत नाही. त्यामुळे आव्हान स्वीकारा आणि आयुष्याची नौका तुफान वेगाने चालवा.

शून्य! वाटेत भेटलेले एक बंगाली साधु, जे सहा महिने हिमालयात १८००० फुटावर एकान्तात असतात, ते म्हणाले की साधु बंगालमध्ये शिकलेला असलाच पाहिजे असा संकेत आहे. न शिकलेले साधु म्हणजे केवळ पोटार्थी! आणि आम्हांला याचा अनुभव आला.

नर्मदा प्रदक्षिणा म्हणजे जीवनानंद. आपल्या बांधवाना भेटण्याची संधी, त्यांचे आचार विचार जाणून घ्यायची संधी, निसर्ग, अरण्ये, पशुपक्षी, शेती, वनस्पती हे सारे निरखण्याची संधी आणि प्रदूषण मुक्त हवा, पाणी, निळेशार, क्षितिजाला सभोवार टेकलेले आकाश आणि रात्री दिसणारी असंख्ये नक्षत्रे यांचा आनंद काही विलक्षण आहे.

आजही शास्त्रयुद्ध प्रदक्षिणा तीन वर्षे, तीन महिने व तेरा दिवसांची मानली जाते. चातुर्मासात प्रवास नाही. एकेकाळी हे अशक्यच असावे कारण पावसाच्या पाण्याने सर्व नद्या, प्रवाह आवेगाने तुडुंब भरून वाहतात.

प्रबोधिनी एकादशीला, म्हणजे चातुर्मास संपून देव उठतात त्या दिवशी ही प्रदक्षिणा सुरू होते. खरखोन जिल्ह्यातील प्रतयेक घरात, ही प्रदक्षिणा केलीच पाहिजे, असा रिवाज दिसला.

गटागटाने निघाले तरी गट एकसंघ राहत नाहीत. आमचा गट मी + एक दांपत्य असा केवळ तिघांचा असूनही फुटला व शेवटचे तीन एक आठवडे मी तसा एकटाच होतो. तसा, म्हणण्याचे कारण एक इन्दौरचा युवक त्या नंतरच्या काळात माझ्याबरोबर होता.

नव्वद दिवसानंतर, २/३ प्रदक्षिणा झाल्यानंतर, घरी परतलो. दैनंदिनी लिहिल्याशिवाय मी कधीही झोपलो नाही.

या दैनंदिनीतील मजकूर आपल्याला सादर करत आहे. वि.प्र.मं. दिशाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर व माझा मित्र मोहन पाठक यांचे मनःपूर्वक आभार!

**परिक्रमेला सुरुवात**

दि. २४.११.२०१२ प्रबोधिनी एकादशी

प्रस्थानाच्या वेळी संध्याकाळी सुहृद् घरी जमले. नाही हो करत सामानाचे वजन दहा किलो झाले.

परिक्रमेला सुरुवात करण्याचे नक्की झाले आणि एक एक अशी दोन भोजने, त्यात एक पूजेसहित झाले आणि नर्मदामैय्या परिक्रमा काळातही उपाशी ठेवणार नाही याची जणू नांदीच म्हटली गेली होती.

दि. २५.११.२०१२ – पंजाब मेल वेळेवर ५.०० वाजता पहाटे खांडव्याला पोहोचली. स्टेशन बाहेर बस अड्डा आहे. इंदौरला जाणाऱ्या खाजगी बसने ५।। वाजता निघाले. मोरटक्का येईपर्यंत छान उजाडले(७.००) मोरटक्का येथे दुसरी बस उभी होती. ७.१५ ला निघून २० मिनिटात बस ॐ कारेश्वरास पोहोचली. बसेस खाजगी असल्या तरी सीट स्वच्छ व आरामशीर होत्या.

खांडव्याला स्टेशनवर चहा झाला. नंतर मोरटक्क्याला चहापाणी फराळ झाला. ॐकाराश्वराकडे जाताना वाटेत श्री गजानन महाराज भक्तनिवास पाटी/कमान पाहिली आणि आत वाटेला लागलो. बरेच आत आहे आणि आत दिसताहेत ती घरे आश्रमाची नाहीत हे लक्षात आल्यावर विचारत पुढे निघालो.

तेवढ्यात मागून एक मराठी स्त्री आम्हांला हकारे घालत धावत आली, म्हणाली, ''मला बोलायचे नव्हते, पण तुम्हांला जवळची वाट सांगायला आले, त्या वाटेने तुम्ही भक्तनिवासाच्या पिछाडीला लगेच पोहोचाल.

नर्मदा मैय्याने दिलेली ही पहिली साक्ष होती. स्नान आटोपून परिक्रमा परिचय/प्रवेश पत्रासाठी चौकशी करत पंचायत कार्यालय गाठले. रविवार होता, १०।। वाजले होते, कार्यालय बंद होते परंतु आम्ही परत फिरणार तोच

एक बाबू (कर्मचारी) आला. कागदावर शिक्के पडले. परंतु आमच्या कागदावर परिक्रमेचा उल्लेख नसल्याने त्याने पुढील कार्यवाही थांबविली व आम्हाला संकल्पवाल्या गुरुजींकडून परिक्रमा पर्ची आणण्यास सांगितले. गुरुजी ॲडव्हान्समध्ये हे पत्र देण्यास तयार नव्हते आणि तो बाबू २ तास थांबून कार्यालयातून निघून जायचा होता. परिचय पत्रावर सही झाली असती, तर उद्या सकाळी आम्ही लवकर सुरुवात करू शकलो असतो. पलिकडे जाऊन ॐकार गांधाता (पर्वत) क्षेत्राची (सात किलोमीटर) परिक्रमा करायची असल्याने आम्हांला आज संकल्प करायचा नव्हता.

अखेरीस आम्ही अकरा वाजता (पंचायत कार्यालयास कळवून की आज चिठ्ठी मिळणार नाही) ॐकार परिक्रमा सुरु केली व २।। तासात गोमुख घाटावर आलो. सतीश शर्मा हे गुरुजी कुणा दोन परिक्रमावासियांचा संकल्प सोडत होते. त्यानंतर आम्ही सविस्तर बोललो.

उद्या सोमवारी मुण्डण होत नाही म्हणून ते आजच उरकले. आई वडिल नसल्याने मिशासुद्धा क्षौर कार्यात काढाव्या लागल्या. तोंडाला, डोक्याला भरपूर साबण लावून, नंतर स्वच्छ धुवून, घाटाच्या पायरीवर रीतसर मुण्डण झाले.

**गायीच्या रूपातील नर्मदा**

खरे म्हणजे आम्ही टॉवेलसुद्धा आणला नव्हता. त्यामुळे सगळी वस्त्रे उतरवून फक्त अंतर्वस्त्रावर क्षौर केले आणि ओल्या अंगाने उभे असता पोटाला बाजूने स्पर्श झाला म्हणून पाहिले तर गाईने चाटायला सुरुवात केली होती. वळावे तर ती ओटीपोट, मांड्या, हात, कोपर सारे काही चाटून चाटून माझी टॉवेलची गरज नाहीशी करीत होती. जणू काही नर्मदेनेच गाईच्या रूपाने स्वतःच माझे ओले अंग चाटून पुसून कोरडे केले.

**नर्मदा मैय्याची ही दुसरी साक्ष**

भक्त निवासात येऊन संध्याकाळी ४।। वा. पुन्हा बाहेर पडलो. फुले सोडून इतर संकल्प साहित्य, म्हणजे मैय्याच्या दोन प्रतिमा, नारळ, आसन, २००/२०० ग्रॅम पेढे/बर्फी, ५ कुमारिकांसाठी ५ गळ्यातले मोजी सर घेतले. तत्पूर्वी मैय्याजळासाठी छोटी कुपी काही विकत मिळेना. परिक्रमावासियांनी त्या संपविल्या होत्या (म्हणजे परिक्रमेच्या १ ल्या दिवशीच) चातुर्मासात परिक्रमा बंद असते. प्रबोधिनी एकादशीला ती पुन्हा सुरू होते.

कुपीच्या शोधात होतो पण वाटले की आता शक्य नाही; त्याचवेळी आमच्याबरोबर पायऱ्या चढत असलेली बहुधा सकाळचीच गाय दिसली. आम्ही अचंब्यांने थांबलो तर गायही जागीच उभी राहिली आणि आम्ही चढायला सुरुवात केली तेव्हा मी सुद्धावर चढू लागलो आणि पुढल्याच एका दुकानात आम्हांला छोट्या कुप्या मिळाल्या.

**ही मैय्याची तिसरी साक्ष मानावी का?**

मुण्डण करून आलो होतो. बाहेर पडताना मी भगवी छाटी लावली व डोक्याला दुसरी पांढरी लुंगी गुंडाळली. भक्त निवासाच्या आरशात पाहिले तेव्हा आमचे रूप आम्हांला विद्रुप अनोळखी वाटले. अशोक तर दाढी मिशा आणि केसांविना वयस्कर वाटू लागला आणि म्हातारपणी दिसावे तसे तोंडाचे बोळके दिसू लागले. (माझी अवस्था काही वेगळी नव्हती फक्त मिशा गेल्या तरी खूप मोठा फरक वाटत नाही. असे मंगल म्हणाली.)

भक्त निवास, अतिशय प्रशस्त, स्वच्छ, टापटीप सगळीकडे प्रसन्नता आणि बाग, हिरवळ, रंग नवे असलेले भक्तनिवास, भोजन ही फक्त ३० रुपयांत. सर्व काही उत्कृष्ट ६ ।।। ते ७ गजानन महा.समोर सायं प्रार्थना घेतली. भोजन केले. मंदिरासमोर तुळशीचे यथासांग लग्न लावले. तो पवित्र प्रसन्न सोहळा अनुभवला आणि डायरी लिहून दिवस संपला.

---

तुम्हांला दुसऱ्यांचा आनंद लिहिणारी पेन्सिल व्हायला जमले नाही, तर दुसऱ्यांचे दुःख 'खोडणारे' खोडरबर तरी होता येते का याचा नक्की विचार करा.

**सोमवार दिनांक २६.११.२०१२ ॐकारेश्वर-कटार**

सकाळी ७ वाजता गोमुख घाटावर संकल्प विधी पार पडला.(कन्यकांसाठी गळ्यातली माळ व गोड म्हणून पेढे व बर्फी घेतली होती)

भक्त निवास सोडताना स्नान करून लुंगी, कोपरी हा वेष धारण केला होता. पायात बूट होते. घाटावर गोमुखावरच चौथरा आहे. सगळीकडे ओलं ओलं होते. चौथऱ्याच्या एकाच बाजूला रहावे, दुसरीकडे येऊ नये असा पुजाऱ्याचा कटाक्ष होता. (कारण, नर्मदा प्रवाह तिथे ओलांडला जाऊन परिक्रमा लगेचच खंडित होते असे नंतर समजले.)

संकल्पासाठी पूजेपूर्वी जलकुपीमध्ये गोमुख धारेचे अर्धे व नदीचे अर्धे पाणी भरून घेतले होते. नर्मदामातेची प्रतिमा, रुपयावर स्थापन केलेला सुपारी-गणेश आणि जलकुपी यांचे पूजन झाले. आमच्या परिचयपथावर गुरुजींनी काहीतरी लिहीत पंचायत शिक्का तर कालच पार पडला होता. सहीविना!

सव्वा आठला ॐकारेश्वराहून बडी परिक्रमा उचलली आणि १२।।/१।। ला मोरटक्का सडकमार्गाने गाठले.

ॐकारेश्वरला कार्तिक मेळावा सुरू झाला आहे त्यानिमित्ताने दुकानांची असंख्य पाले रस्त्याच्या दुतर्फा पडली आहेत. काल रात्रभर सर्व हॉटेले, खानावळी, मौज मजा सिनेमे इत्यादि सुरू केले आणि 'रावडी राठोर'च्या कर्णकटू आणि सततच्या अनाउन्समेण्टमुळे भक्तनिवासातील शांतता पूर्णपणे नाहीशीच झाली होती.

मोरटक्क्याला हॉटेलमध्ये जेवलो. जेवण छान होते. आग्रहाने पोटभर खाऊ घातले. रस्त्याला दुतर्फा झाडी बऱ्या बऱ्याच भागात असल्याने, वाटचाल सौख्यकारक झाली. परंतु जत्रेसाठी येणारी वाहने, पायी येणाऱ्यांचे थवे यांमुळे रहदारी फार होती आणि वाहने सुसाट होती.

वाटेत भेटणारे 'नर्मदे हर' म्हणून अभिवादन करत होते. आम्हीही प्रतिसाद 'नर्मदे हर' नेच देत होतो. मोरटक्का सोडल्यानंतर एका मंदिरापाशी एक गृहस्थ भेटले. ते एका चौथऱ्यावर शांत बसले होते. हवाई दलातून निवृत्त झाल्यावर फिरताना हे ठिकाण आवडले म्हणून भाड्याने खोली घेऊन इथेच स्थायिक झाले. बायकामुलांना निमंत्रण आहे पण ते वास्तव्याला येऊ इच्छित नाहीत. हे केव्हातरी त्यांना जाऊन भेटतात.

मोरटक्क्याहून एका किलोमीटर अंतरावर सडकेला ९०°मध्ये एक पायवाट नदीच्या काठाकाठाने जाते. टोकसर मार्गे गोमुख हा टप्पा १२ कि.मी आणि मोरटक्का १२ कि.मी. असा २४ कि.मी चा विचार होता. नदीकाठचा रस्ता हळूहळू खूप उघडखाबड दगड गोट्यांनी भरलेला होता. चालणे आनंददायी राहिले नाही. फक्त इतकावेळ दूर असलेली मैय्या सतत दृष्टीसमोर आहे. याचा आनंद वाटत होता. दगडगोट्यांवर वरून झरणाऱ्या पाण्यामुळे वाटचाल चिखलमय झाली. किनाऱ्यापाशी झाडे नाहीत त्यामुळे ऊन तापदायक झाले.

वाटेत शिवशक्ती मंदिराच्या पायऱ्या आणि तिथे सावली पाहिली व वीस एक मिनिटांसाठी आसने लावली (म्हणजे पडून आराम केला.)

दहा किलो वजन पाठीवर असल्याने खांद्यांना चांगलीच रग जाणवू लागली. त्यामुळे सॅक उतरवून ठेवावी वाटे. टोकसर टप्पा गाठणे कठीण वाटू लागले. त्यातच एकूण १६ कि.मी. चालल्यावर कुणीतरी किनाऱ्यावरील सुखरामबाबांचा आश्रम सांगितला.

मी आतून पूर्ण भिजून गेलो होतो. किनाऱ्यावरून डावी घेऊन चढण्याचे ठिकाण आल्यावर मी पाण्यात उतरून स्नान केले. कपडे पिळून काढले.

---

स्वप्नांसारखा सहवास नाही. सावलीसारखी सखी नाही. एकटेपणाची जाणीव होत असेल तर मैत्रीसारखी साथ नाही.

**मुक्काम श्रीराममंदिर**

आश्रमात फारच अगत्याचे स्वागत झाले. चहा, भोजन, आसन यांचा आग्रह झाल्याने इथेच राहण्याचे ठरविले.

स्नानानंतर मैय्याची पूजा केली. स्तोत्रे म्हटली फार प्रसन्नता वाटली. रात्री दालबाटी व भात याचा भोजन प्रसाद होता. फारच स्वादिष्ट, परंतु वझे दांपत्याला तो तिखट वाटला.

आश्रम नदीकिनारी पण एका ठिकाणी अवघड चढण पार केल्यावर येतो. आश्रम म्हणजे एक प्रशस्त आडवी कुटी आहे. नंदिनी व तिची कन्या रत्ना अशा दोन गाई आहेत. त्यातली आई शांत तर कन्या फार अवखळ! आश्रमात छान थंडावा होता.

दिवस२ रा – कटार आश्रमातच पहाटे स्नान केले. काल रात्री झोपलो तेव्हां फक्त आठ वाजले होते. त्यामुळे रात्री १ ।। वाजताच जाग आली, ३ ।। नंतर झोपही येईना!

सकाळी ६ । वाजता कटार सोडले. नदी काठावरून पुढची वाटचाल केली. कालची वाटचाल म्हणजे आनंददायक न वाटावी, अशी खडकाळ असल्याचा अनुभव घेऊन पुढे किनारा सोडण्याचे ठरविले होते परंतु वाट सोपी आहे कळल्याने किनाऱ्याजवळून प्रवास केला. 'बुजुर्ग (बुद्रुक) अली' गावातून वर चढून पुढे टोकसार गाव लागले. सॅक टेकावी म्हणून पहिल्या झोपडीशी थांबलो तर सचिन नावाच्या ८ वी तील हुशार विद्यार्थ्यांशी ओळख झाली. पडवीत अभ्यास करत होता, म्हणून वह्या पाहिल्या, तर हस्ताक्षर उत्तम, ड्रॉइंग चांगले असेलच या कयासाने वही पाहिली तर उत्तमोत्तम चित्रे काढली होती. हा बालक अगदी साध्या घरातला! आम्हांला त्याचे खूप कौतुक वाटले.

टोकसार नंतर कांवरिया गाव, नंतर रावेर नंतर बकाँया गाव, जेथे आम्ही रात्री मुक्काम केला. रावेर नंतर बकाँया गावाच्या अलिकडे खडसाई नदी लागली ती फूट दोनफूट तीन फूट पाण्यातून पार करावी लागते. यासाठी पायात दगड घातले आहेत. प्रवाहाला आढे होती, दगडांवर शेवाळ दिसत होते आणि शेवाळ्यासारख्या लांब लांब वनस्पती पाण्याच्या ओघाबरोबर दगडांवर आपले हातपाय पसरून आमच्या पावलांखाली येऊन घाबरवत होत्या.

आमची वाट चुकली असती; पण वाटेवर मैदान वजा जागेवर उभ्या असलेल्या ट्रक/ट्रॅक्टर ड्रायव्हरने पायवाट दाखवून मार्गाला लावले; तो पर्यंत आम्ही गाडी रस्त्याने चालत होतो आणि तसेच पुढे निघून गेलो असतो. नदी ओलांडायची म्हणून खळखळाट करणारी उथळ वाट शोधली तेवढ्यात कुठूनसा एक लहान मुलगा आला आणि आम्हांला नदीपार करून गेला.

बकाँया गावात श्रीराम मंदिरात राहिलो. नदी पार केल्या केल्या त्याच पाण्यात काठावर बसून स्नान आटोपले होते. चालून चालून कपडे ओले चिंब होऊन छाटीप्रमाणे लावलेल्या केशरी लुंगीचा रंग इतर पांढऱ्या कपड्यांना लागल्यामुळे सर्व कपडे केशरी झाले.

आश्रमात तयार भोजनप्रसाद मिळाला. तिक्कड व भाजी. त्यांतील भाजी फार तिखट होती. आश्रमाने उतारा म्हणून साखर दिली. ताक असते तर? असा विचार येऊन गेला.

या गावात शिवलिंग तयार होतात. १ रु. पासून लाखोरुपयांपर्यंत सर्व! एका घरी ते काम पहायला गेल्यावर मंगलला एक ४'' लांबीचा बाण चिंताबाईने भेट दिला.

**दिवस ३ बकाँया –मर्दाना–तेली–ससावद–नेपा**

दुसऱ्या दिवशी सकाळी आम्हांला त्यांच्याकडे चहाचे निमंत्रण होते. तेव्हा मलाही एका सुंदर बाण भेट मिळाला.

देह हा कष्टासाठीच असतो; त्यामुळे त्याचं सुख दुःख सारखं मानावं.

सकाळी ६।वा. आश्रम सोडला पावणे सात नंतर गाव सोडले. कटेरापासूनची वाटचाल ही गावागावातून आणि माती रस्त्यावरून आहे.

मर्दाना गावात अचानक एक ग्रूप भेटला आणि वझे म्हटल्यावर 'मी तुम्हांला ओळखतो' असे एक व्यक्ती म्हणाली. ते व्होल्टासमधील (रिटार्यड) खरे होते. भेट झाली खूप आनंद झाला.

सकाळी २/३ तासानंतर उन्हाचा असह्य ताप सुरू होतो. सॅकमुळे पाठीला-खांद्यांना रग लागते आणि दर १५/२० मिनिटांनी सॅक खाली ठेवावीशी वाटते. वाटेत झाडे कमी आहेत. ती सुभाबळीची, त्यांना सावली नाही. बाहेरील हवा थंड असली तरी आमच्या शरीराची उष्णता प्रचंड वाढते. त्यामुळे सारखे थांबावेसे वाटते. (क्रमशः)

**श्री. अरविंद ओक**
मानपाडा, डोंबिवली.
भ्रमणध्वनी : ९८३२४४१५८०/
९३२३०७०१९७

●●●

## दिशासाठी

**आपले लेखन सहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्ययन अध्यापन विषयांतील नवीन घडामोडी, नवीन ज्ञानक्षेत्रे यांबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.**

**तरी, आपणाकडून लेखन अपेक्षित करीत आहोत.**

**– संपादक**

## *नोंद - महत्त्वाच्या परिषदेची*

*केरळ मधील काझिकोडा येथे ६ वी आंतरराष्ट्रीय वैदिक परिषद ७ ते १० जानेवारी २०१४ या कालखंडात झाली. वेद मंत्राचा घोष कसा केला जाई याच्या प्रात्यक्षिकासह त्याच्या महत्त्वासंबंधी यावेळी चर्चा झाली. परिषदेचा रोख प्रामुख्याने वैदिक ग्रंथ त्यातील मजकुराचा अन्वयार्थ या ग्रंथाचे पारंपरिक महत्त्व केरळ मधील या ग्रंथाचे अध्ययन व अध्यापन इत्यादी विषयांवर होता.*

*परिषदेस जगभरातील अनेक अभ्यासक आले होते. वि. प्र. म. दिशाचे संपादक डॉ. विजय बेडेकर हेही परिषदेस आवर्जुन उपस्थित होते. अशा स्वरुपाची पहिली परिषद हार्वर्ड (१९८९) क्योटो विद्यापीठात झाली. जपापन (१९९९) लिडन विद्यापीठ, नेदर लॅडर्स (२००२) टेक्यास विद्यापीठ (२००७) व समानियामनील बुखारिस्ट येथे या पूर्वीच्या परिषदा संपन्न झाल्या.*



# भारतीय संस्कृती-बीज, मॉडेल व साधना

*दीर्घ खंडानंतर श्री. साने यांनी या अंकापासून लेख लिहिण्याचे ठरवलेले आहे - संपादक*

### प्रास्ताविक

भारताच्या मानवी संस्कृतीच्या इतिहासात हे वर्ष ई.स.२०१३, हे एका वैचारिक त्सुनामी वादळासारखे आले होते. जसे 'समुद्री वादळाचा केंन्द्र बिंदू' - **'लँड फॉल'**, हा जमिनीवर कुठे पडेल व त्यानंतर मानवी जीवनाची, पर्यावरणाची किती कशी धूळधाण होईल, हे तर्कापलीकडे असते. या वादळाने ज्या समाजाची, जीवनाची 'सिस्टिम' उध्वस्त व उखडून टाकणारी होते, हे सांगणारे, हे वर्ष; समाजाच्या 'स्थिर' व 'नियंत्रित' अशा व्यवस्था असतात व त्यात जीवन स्थिर व संतुलित असल्याचा 'भास','समाज धारणेत असतो, त्याला जबरदस्त धक्काही वादळे देऊन जातात. समाज अगदी नागडा उघडा होऊन आपल्या जीवनाच्या उध्वस्त अवस्थेत त्यातील अज्ञान, विश्वास, श्रद्धा या सर्वांकडे अचंबित होऊन पाहू लागतो. त्याच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक यंत्रणा किती तकलादू आहेत हे पाहू लागतो. तसेच त्या यंत्रणांच्या सामर्थ्याचा जो अनुभव जखडून टाकण्यात यशस्वी असतो, ती उथळ शांतता ही उलथापालथ होऊन उताणी पडते.

### मूलभूत जीवन धारणा

अशा वैश्विक आपत्तीनंतरच्या अवस्थेतच मानवी समाज काही मूलभूत विचार करण्याला उद्युक्त होतो, एरव्ही नाही!! तो एका शेंडी व बुडखा माहीत नसलेल्या भौतिकवादी सामाजिक यंत्रणेच्या खोट्या शांततेच्या अनुभवातील 'मायाजालात', आपले, समाजाचे, निसर्गाचे अस्तित्व व त्यातील 'वैश्विक चिरंतन सत्य विसरून जगत असतो. हे नेहमीच्या जाणिवेतील 'भौतिक दर्शनी चित्र पूर्ण वैश्विक सत्य नसते व ते ह्या नैसर्गिक आपत्तींमुळे उघडे पडते.


### भारत राष्ट्राची अवस्था

अशाच काही अवस्थेत, या दर्शनाच्या छोट्याशा दर्शनाने गोंधळून गेलेला आपला प्रिय भारत देश त्यामध्ये सापडलेला आहे!!

काय आहेत ह्या 'त्सुनामी' वादळाच्या शक्तिशाली सांकेतिक खुणा? नमून्यादाखल एखादी पाहू यां!!

### स्त्री-पुरुष संकल्पना

'स्त्री पुरुष संबंध', बलात्कार, सामूहिक बलात्कार व त्या पाठोपाठ आलेल्या लैंगिक संबंधांबद्दल(Gender Freedom) 'जेंडर स्वातंत्र्याच्या वादळी हवा व उंच लाटा!! समलिंगी संबंधाच्या स्वातंत्र्याच्या मागण्या व त्याला कायद्याचे संरक्षण मानणाऱ्या घोषणा व लढे होत.



**स्त्री-पुरुष अध्यात्मिक युगूल**

मग यांत चुकतंय काय? विस्मरण कशाचे?

आपण प्रपंची लोक आहोत म्हणून प्रपंचात उचित प्रयत्न केल्याशिवाय राहू नये.

भारताच्या सांस्कृतिक ऐतिहासिक वारसाचे व ज्ञानाचे काय दिवाळे वाजले आहे?

**"Creation Theory of the Vedas"**

प्रथम सर्वात आश्चर्याची गोष्ट म्हणजे ज्या भारतीय संस्कृतीमध्ये पृथ्वीवरील जीवनाचे, जे वैश्विक उत्पत्तीचे ज्ञान, ऋषी मुनींनी वैदिक श्रुती ज्ञानावर आधारलेले सांगितले आहे, त्याबद्दलच्या विस्मृतीचे होय!

या वैश्विक उत्पत्तीचे संगतवार वर्णन उपलब्ध आहे. त्याला **'Vedic Creation Theory',** म्हणजे 'वैश्विक सृजनसृष्टी' असे संबोधण्यात येते. त्याला वैश्विक सृष्टीची निर्मिती क्रम म्हणजे 'सृजनात्मक' व 'उत्क्रांति' तत्त्वावर झालेली निर्मिती असे जाणले जाते. त्याचा संक्षिप्त उत्पत्ती क्रम हा 'आकाश, वायू, तेज, जल, पृथ्वी तत्त्वे व नंतर क्रमशः 'शब्द, स्पर्श, रूप, रस, रंग' या शक्ती निर्मित पंचतत्त्वांचा उदय व आधार हाच वैश्विक इतिहास आहे.

**मानव शरीर रचना (Human Form)**

त्यानंतर जी सृष्टी निर्माण झाली त्यांत 'मानवी फॉर्म' म्हणजे मानवी देहाला आवश्यक अशा पंचेद्रियांची देणगी होय. त्या इंद्रियांची रचना मस्तिष्कामध्ये 'श्रोत्र, त्वक, चक्षू, जिव्हा, घ्राण अशा पंचेद्रियाची प्राप्ति होऊन झाली, असे 'वेदिक ज्ञान' आपल्याला सतत सांगत आलेले आहे.

हे मानवी शरीराचे वर्णन आहे व त्या इंद्रियांच्या बहिर्गत, अंतर्गत सामर्थ्य व उत्क्रांती तत्त्वांचेही वर्णन व जाणिवा मानवी समाजाला (निदान भारतीय समाजाला) ज्ञात आहेत. ह्या ज्ञानावर आधारलेल्या अनेक सूक्ष्म साधना या कुंडलिनी जागृती, तंत्र, मंत्र व यंत्र शारद्यात आहेत व त्याचे साधक, आजही अनुभव घेत आहेत.

**नर – मादी द्वैती बीज रुप**

त्याच सृजन सृष्टीत स्त्री–पुरुष हा शारिरीक लिंगभेदावर आधारलेला समाज निर्माण झाला आहे. हे 'डिझाईन' भौतिक विज्ञानातील, प्रांतातील नव्हे तर ते वैश्विक **'बीज ज्ञान'** आहे. ह्या बीजाबद्दल अजूनही पूर्ण ज्ञान नाही. मानवी समाजाला, ह्या युगायुगांतील प्रगतिशील 'मानवी वैज्ञानिक ज्ञानाच्या' (एरव्ही कौतुकास्पद पण ''पूर्ण ज्ञानाच्या'' वा 'सत्य' ज्ञानाच्या) तुलनेने समाधानकारक बिलकुल नाही. हे ज्ञान खरे तर समाधिजन्य व अनुभती शास्त्राच्या आवाक्याने व साधनेने प्राप्त होते.

एव्हढेच नव्हे, तर हा लिंगभेद प्राणिजीवन, वनस्पती जीवनातही रचलेला आहे. ही द्वैत विभागणी पदार्थज्ञानातही दिसून येते. पुष्कळ वर्णन करता येईल. पण, दुःखाची गोष्ट ही आहे की ह्या ज्ञानाचा उल्लेखही या वैचारिक गोंधळावर निर्माण झालेल्या 'टनावारी' पांडित्य प्रदर्शनात वा चळवळीत ओझरताही दिसत नाही. कुणी म्हणतात की त्याची गरज नाही!!

**लिंगभेद व राजकारण**

मुद्दा आहे तो हा की सामाजिक व सांस्कृतिक नेते हे **'Vote Politics'** मध्ये याचा फायदा कसा होईल इतकाच विचार करत आहेत.

**"Sexual Pleasure"** ज्या उर्जेने मिळते, याचा विचारच जेथे अपूर्ण आहे. तेथे ह्या उर्जेचा आध्यात्मिक साधनेत काय अंतर्भाव आहे? हे जाणू इच्छित नाहीत.

मला या विषयावर पुष्कळ बोलावयाचे आहे. पण ते नंतर केव्हा तरी पाहू या!! पण, आज ह्या विषयाचा उल्लेख मी एका (मानवी ज्ञानाच्या )निराळ्या कारणाने करीत आहे.

**मर्यादा एक बाल्यावस्था**

ह्या पृथ्वीवर असलेल्या मानवी समाजाने आपल्या भौतिक व बौद्धिक सामर्थ्याबद्दल पुष्कळ मोठे व कौतुकास्पद प्रदर्शन केले आहे. पण, ते कौतुक एका लहान बालकाच्या प्रयत्नाइतकेच मर्यादित आहे.

**ऋग्वेद व उषासूक्त Rise of Conscriousness**

स्वतःच्या व समाजाच्या म्हणजे व्यष्टी, समष्टी सृष्टी वगैरेच्या 'अस्तित्वाचे' भान या मानवाला ज्या वेळेस


झाले, तेव्हा त्याच्या मानवी ज्ञानाचा हा उषःकालीन उदय होता. Ref. Rigved (Usha Sukta) (संदर्भ ऋग्वेद) त्याच्या कॉंशसनेसला पशुपक्षी व वनस्पतींच्या तुलनेने एक हनुमान उडी मारणारा क्षण होता हे खरेच आहे!! पण, त्यामुळे झालेला ऐतिहासिक ज्ञानाचा व त्याच्याबद्दलच्या संशोधनाचा मार्ग त्याने आज सोडून दिला आहे असे पूर्णपणे दिसते.याचे कारण त्याची संशोधनाची दिशा ही एकांगी भौतिकवादी शास्त्राच्या सीमेमध्ये बंदिस्त आहे.

या संशोधनाला देहांतर्गत शक्ती सामर्थ्याचा लाभ घेता येत नाही. अतींद्रिय ज्ञान व शक्ती या वस्तुतः त्याला त्याच्या शरीरांत जन्मतःच प्राप्त झालेल्या आहेत. त्या जागृत करणे हा खरा पुरुषार्थ आहे. याचे विस्मरण झाले आहे.

त्या सूप्तावस्थेत आहेत, पण त्यांना जागृत करण्याच्या साधना विस्मृतीत ढकलल्या जाताहेत!!

### आध्यात्मिक ज्ञान

मुळातच ''मी'', म्हणजे शरीर नव्हे तर 'आत्मा' आहे, हे ज्ञान त्याला 'सत्य ज्ञान' रहात नाही, तर एखादे सांप्रदायिक धर्माचे, विश्वासाचे, अंधश्रद्धेचे वाटू लागले आहे. ह्या नाशिवंत वा मर्त्य शरीराला 'श्रीयंत्र' हे नाव तंत्रसाधनेत प्राप्त झाले आहे.



**श्रीयंत्र**

या श्रीयंत्राची डिझाईन ईश्वरी आहे. त्याला 'नैसर्गिक' म्हणून निरीश्वरी व तांत्रिक करण्यात आले आहे. ह्या 'श्री यंत्राच्या' अत्यंत गूढ व अतींद्रिय ज्ञानसाधना, शक्ती साधना त्याला रॉकेट, चंद्रयान वा मंगळयानाच्या उपकरणापुढे तुच्छ वाटतात. त्या यानावर अनेक कोटी कोटी डॉलर्स हे आपलीच श्रमनिर्मित शक्तिसंपत्ती तो उधळून टाकावयाला तयार आहे. पण, आपल्याच जवळचे हे 'यंत्र' तो संशोधन योग्य समजत नाही. ज्या भारतात हे उद्योग आपल्या पूर्वजांनी केले. त्यांच्या ज्ञानाबद्दल तो बेदरकार अनुत्सुक आहे, अविश्वासू व अश्रद्धासुद्धा आहे. भारतात ही दुर्दैवी स्थिती आहे!!

**Embodied Consciousness** – मुख्य म्हणजे स्वतःच्या अस्तित्वाचा खरा अर्थ ''शरीरबद्ध आत्मा'' ("Embodied Consciousness") आहे, असे तो ओळखत नाही. त्यामुळे, ह्या खऱ्या सत्य ज्ञानाचा लाभ त्याच्या आत्मबुद्धीला स्वतःच्या शरीर यंत्राच्या योगाने व समष्टि सहकाराने, म्हणजे समाजाच्या युगायुगांतून होणाऱ्या ज्ञानसाधनेने होतो. आज या मितीला एका मानवी ज्ञानाच्या सद्यपातळीवर हा लाभ प्राप्त झाला आहे. याचा ही विसर पडला आहे.

### भौतिक ज्ञानाचा आत्मिक ज्ञानात यज्ञ संक्रमण

हे ज्ञान 'शरीरी' स्थित नसून एका तीन व्याहृतीमार्फत संक्रमण होऊन आत्मज्ञानाच्या स्थितीला पोचते हेही विस्मरण झाले आहे. या ज्ञानाची साधना वगैरेंची 'गायत्री मंत्र' साधना पद्धती आहे. हा एक महायज्ञ आहे.

स्त्री–पुरुष युगूल व मानवी बीज जनन या एका लेखात एवढा मोठा व्याप लिहिणे व सांगणे दुरापास्तच आहे. पण ज्या स्त्री–पुरुष संबंधाबद्दल एक अज्ञानी व विकृत वैचारिक गोंधळाचा तो बळी पडला आहे, तो सुद्धा ह्या स्त्री–पुरुष संबंधाचा 'गूढ संकेत', ह्या आत्मिक उन्नतीच्या वैश्विक यंत्रणेचा भाग आहे. हे अत्यंत महत्त्वाचे गूढ, तो दुर्दैवाने विसरला आहे.

### १६ संस्कारातील विवाह संस्कार

हा संस्कार 'विवाह संस्कार' वैश्विक अग्नि देवतेच्या साक्षीने होते. या संदर्भाचा विसर त्याला पडला आहे.

आधुनिक तंत्रज्ञान अनाकलनीय असल्याने रुग्ण फारसे प्रश्न विचारु शकत नाहीत, याचा डॉक्टर फायदा उठवतात.

### भारतीय ज्ञानाचे वेगळे नेतृत्व

मला प्रश्न पडला आहे की ह्या त्सुनामी वादळातून ह्या भारतीय सुदैवी समाजाला व जागतिक वा वैश्विक नेतृत्वाला पुन्हा जागृत कसे करता येईल? कारण ह्या पृथ्वीवर भूतलावर भारतात ह्या बीज ज्ञानाचा व संस्काराचा वर्षाव झाला आहे. भारत हे ज्ञान विश्वाला देऊ इच्छितो.

**New Agenda** – मला हा अजेंडा Agenda महायोगी अरविंदांच्या एका छोट्या निवेदनात मिळाला असे वाटते. मी त्यांचा अजेंडा माझ्या भाषांतरित स्वरूपात येथे उद्‌धृत करतो आहे.

भारताची पुनःजागृती व आत्मजागृती करणे हा खरा राष्ट्रीय अजेंडा असावयाला हवा मग त्यासाठी काय कार्यक्रम व कर्तव्ये आहेत, त्याचा हा अजेंडा आहे.

### महायोगी अरविंद घोष अजेंडा


Extract taken from " India magazine" September 2013

Present problems and the future work

"The recovery of the old spiritual knowledge and experience in all its splendor, depth and fullness is its first most essential work: the flowing of this spirituality into new forms of philogophy, literature, art, science and critical knowledge is the second; and original dealing with modern problems in the light of the Indian spirit and the endeavor to formulate a greater synthesis of a spiritualized society is the third and most difficult. It's succes along with these three lines will be the measure of its help to the future of humanity.

Cwsa - 20:151 - Sri Aurobindo"

''आपल्या पूर्वकालीन सत्य श्रृती ज्ञानात्मक स्पिरीच्यूअल ज्ञानाची (अध्यात्मिक ज्ञानाची) पुनःस्मृती जागी करणे व ती ही त्या ज्ञानाच्या भव्यतेसहित सखोल अर्थासहीत आणि पूर्णत्वाने प्राप्त करणे, हे 'प्रथम कर्तव्य' होय.



**श्री. अरविंद घोष**

या 'स्पिरीच्यूअॅलिटीची स्थापना व जाण नवीन तत्त्वज्ञानात, साहित्यात, कलेत व विज्ञानात आणि चिकित्सक ज्ञानात करणे हे **दुसरे कर्तव्य** होय.

त्यानंतरही भारतीय आत्मतत्त्वाच्या प्रकाशात सध्याचे प्रचलित नवीन प्रश्नांबाबत स्वतंत्रपणे व मूलभूत विचार मांडणे आणि त्यावर आधारून जास्त समन्वयी, जास्त सत्यमयी अशा स्पिरीच्यूअल किंवा खऱ्या आध्यात्मिक धारणा असणाऱ्या समाजाची पुनःर्उभारणी करणे हे सर्वात महत्त्वाचे **तिसरे कर्तव्य** ठरेल.

या तिन्ही दिशातील प्रयत्नांच्या यशावर भविष्यातील मानव जातीची व त्या मदतीच्या 'मात्रेवर' या कार्याची मोजमापणी होऊ शकेल!! – श्री. अरविंद घोष

या अजेंडाप्रमाणे स्वामी दयानंद, आर्य समाज व महायोगी अरविंद व मदर यांनी आपले जीवन व्यतीत केले. त्यांच्या प्रयत्नांची जाणीव करून या अजेंडावर कार्य करण्याची आज जरुरी आहे. या लहानशा लेखाचा हा उद्देश आहे.

**श्री. यशवंत साने**
सोनल अपार्टमेंट, सारस्वत बँकेशेजारी,
अग्यारी लेन, ठाणे.
दूरध्वनी – २५३६८४५०
मोबाईल – ९००४०५१८४७
E mail : Saneyr1@mtnl.net.in

●●●

# परिसर वार्ता

**– संकलित**

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, माध्यमिक विभाग

- दि. ६/१२/१३ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला. मा. मुख्याध्यापक श्री. गवई सर, सौ. गांगुर्डे, श्री. गावित, सौ. तातळे इ. ७ वी क,ड चे विद्यार्थी उपस्थित होते.
- हनुमान व्यायामशाळा व शिवसमर्थ विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरशालेय १२ वर्षाखालील लंगडी स्पर्धा दि. ६, ७, ८ डिसेंबर रोजी संपन्न झाली. मुले व मुली दोन्ही संघ प्रथम क्रमाकांनी विजयी झाले.
- दि. २३/१२/१३ रोजी स्त्री मुक्ती संघटना, मुंबई तर्फे 'परिसर की स्वच्छता' कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी सौ. कल्पना अंधारे यांनी सादर केला.
- दि. १४ व १५/१२/१३ माध्यमिक विभागाचा (डॉ. बेडेकर विद्या मंदिर) सांस्कृतिक कार्यक्रम उत्तमरित्या पार पाडला.
- राष्ट्रीय बालविज्ञान परिषद आयोजित प्रकल्प Motion Detector Camp राष्ट्रीय पातळीवरील फेरीसाठी निवड झाली आहे. हि फेरी २७/१२/१३ ते ३१/१२/१३ रोजी भोपाळ येथे पार पडली.
- इ. १० वी ची शैक्षणिक सहल १९/१२/१३ रोजी रेस्ट इन फॉरेस्ट रिसॉट, जांभुळपाडा, खोपोली येथे व इ. ६ वीची ३०/१२/१३ रोजी पॅनोरॉमिक रिसॉर्ल्ट पनवेल येथे गेली.
- स्व. सुरेश पेंढारे चॅरिटेबल ट्रस्ट आयोजित खोपट महोत्सव व लोकमत बालविकास मंचच्या वतीने २६ वा आंतरशालेय समूह नृत्यस्पर्धेत आपल्या शाळेचा प्रथम क्रमांक 'कृष्णलीला' या नृत्यास मिळाला. इ. ६ वी ब च्या विद्यार्थ्यांचा सहभाग होता.
- राष्ट्रीय युवा महामहोत्सव आयोजित मा. श्री. रवींद्र फाटक नृत्यस्पर्धा – २०१३ ३१/१२/१३ रोजी या नृत्यस्पर्धेत इ. ६ वी च्या विद्यार्थ्यांनी कृष्णलीला हे नृत्य सादर केले. या नृत्यविष्कारास द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक सिनेकलाकार सचिन खेडेकर व ठाणे गटनेता श्री. रविंद्र फाटक यांच्या हस्ते रोख रु. ११,०००/– व सन्मानचिन्ह देवून गौरवण्यात आले.

## जोशी बेडेकर महाविद्यालय

**Talent Academy**

महाविद्यालयाच्या Talent Academy च्या विद्यार्थ्यांना आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत भरघोस यश प्राप्त झाले.

'स्पंदन' या आंतर महाविद्यालयीन स्पर्धेत विद्यार्थ्यांना प्रथम पारितोषिकाच्या रूपात ५१,०००/– रुपये आणि ''आश्तोरीज'' या नाटकासाठी चषक प्राप्त झाला.

उत्कृष्ट दिग्दर्शन – प्रथम पारितोषिक – अमोल भोर
उत्कृष्ट नायिका – –''– – तृप्ती गायकवाड
उत्कृष्ट नायक – द्वितीय पारितोषिक – श्रेयस राजे
प्रकाश व्यवस्था – प्रथम पारितोषिक

राज्यस्तरीय आयोजित स्पर्धेत 'उंबरठा' या एकांकी प्रयोगाला प्रथम पारितोषिक मिळाले. उत्कृष्ट स्त्री–पुरुष कलाकार, उत्कृष्ठ दिग्दर्शन आणि उत्कृष्ट नाटक यासर्व उपाधींबरोबरच १०,०००/– रुपये रोख, असे पारितोषिक मिळाले.

शरीर धावपळ सोसतं तोवर एकाकीपणा आपल्यास टाळता येतो.

### राष्ट्रीय सेवा योजना

महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना यांच्यातर्फे विद्यार्थ्यांचा सात दिवसांचा Camp दि. २ डिसेंबर २०१३ रोजी मुरबाड जिल्ह्यातील मामनोली येथे हिंदुसेवा संघ येथे नेण्यात आला.

या सात दिवसात विद्यार्थ्यांना विविध विषयांवर प्रबोधन देण्यात आले.

Team building and leadership या विषयावर श्री. अंकुर काणे यांचे भाषण.

'व्यसन मुक्ती' या विषयावर श्री. विजय वाबळे यांच्या उत्कृष्ट बौद्धिक सत्राचे आयोजन करण्यात आले. त्यांनी तंबाखूचे दुष्परिणाम सांगितले.

'Responsible Netizens' या विषयांतर्गत Internet, Social Networking sites, Cyber Crimes या विषयावर चर्चा व प्रबोधन करण्यात आले.

NSS Volunteers and Civil Services opportunities या विषयावर, सौ. अश्विनी जोशी यांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना लाभले.

अंधश्रद्धा व निर्मूलन या विषयावर श्री. राजेंद्र कोळी यांचे विज्ञानाधारित प्रबोधन विद्यार्थ्यांना अतिशय आवडले.

'पथ नाट्य' या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

त्याबरोबर विविध क्रीडा, प्रकल्पांचे आयोजन या सात दिवसात करण्यात आले.

राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबीर यशस्वी होण्यास महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शकुंतला सिंह, उपप्राचार्य श्री. सुभाष शिंदे व डॉ. स्मिता भिडे तसेच महाविद्यालयाचे व्यवस्थापन मंडळ, प्रा. प्रफुल्ल भोसले आणि त्यांचे सर्व सहकारी प्राध्यापक वृंद यांचा हातभार लागला.

### वाणिज्य विभाग

वाणिज्य विभागातर्फे National Stock Exchange आणि RBI monetary museum येथे विद्यार्थ्यांची व्यावसायिक भेट घडवून आणण्यात आली.

'हस्त पुस्तक' स्पर्धेचे आयोजन C.S.P. च्या विद्यार्थ्यांना करण्यात आले. यात विजयी विद्यार्थ्यांना पारितोषिक देण्यात आले.

डॉ. पराग आजगांवर यांचे Marketing या विषयावर अतिथी भाषणाचे आयोजन करण्यात आले. तसेच यांच्याच मार्गदर्शनाची कार्यशाळा देखील घेण्यात आली. यात एकूण ३०० विद्यार्थ्यांचा सहभाग होता.

### विद्या प्रसारक मंडळाचे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय

१) **के. के लुथरा अभिरूप न्यायालय स्पर्धा** : जानेवारी २०१४ मध्ये दिल्ली येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्तरावरील अभिरुप न्यायालय स्पर्धेसाठी वि.प्र.म.चे टि.एम.सी. विधी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची निवड झाली आहे.

२) **यु. जी. सी. रिफ्रेशर कोर्स** :वि. प्र. म. चे टि.एम.सी. विधी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्या श्रीमती श्रीविद्या जयाकुमार यांनी 'टाटा इन्स्टिट्युट सोशल सायन्स' यांनी प्रायोजित केलेल्या यु.जी.सी. रिफ्रेशर कोर्स 'अ' ग्रेड घेवून पूर्ण केला. सदर कोर्स हा 'सदस्य स्थितीतील मानवी हक्क शिक्षण' या विषयावर आयोजित करण्यात आला होता.

३) मुंबई विद्यापीठाच्या नुकत्याच घेतलेल्या विधी विभागाच्या परीक्षेचे उत्तर पत्रिका तपासणी टि.एम.सी. महाविद्यालयामध्ये पूर्ण करण्यात आली.

४) **बी. सी. आय. तपासणी**: भारतीय अधिवक्ता मंडळाने दिनांक १४ डिसेंबर २०१३ रोजी वि. प्र. मं. चे

टि. एम. सी. विधी महाविद्यालयाची तपासणी केली. सदर तपासणी मंडळामध्ये बी.सी.आय. चे अध्यक्ष मोहन कुमार मिश्रा, श्री. गौडा, तसेच महाराष्ट्र आणि गोवा अधिवक्ता मंडळाचे सी. देशमुख, संतोष व आशीष देशमुख तर प्रा. नम्बीयार, प्रभारी प्राचार्य विधी महाविद्यालय, ऐरोली, नवी मुंबई यांचा समावेश होता.

५) के. व्ही. पेंढरकर महाविद्यालय, डोंबिवली, जिल्हा ठाणे यांनी आयोजित केलेल्या 'रिसर्च मेथोडोलॉजी' या कार्यशाळेमध्ये वि. प्र. मं. चे प्रा. विनोद वाघ यांनी भाग घेतला. सदर कार्यशाळा दिनांक ३० डिसेंबर २०१३ ते ५ जानेवारी २०१४ पर्यंत आयोजित करण्यात आली होती.

## तंत्रनिकेतन

Emerging Trends in process industries या विषयावर आशय नूतनीकरण कार्यक्रम

वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतनच्या केमिकल इंजिनिअरिंग आणि इंस्ट्रुमेंटेशन विभागातर्फे दिनांक ०८ ते १२ ऑक्टोबर २०१३ या कालावधीत Emerging Trends in process industries या विषयावर एका आठवड्याचा आशय नूतनीकरण (Concent Updating) कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

श्री. व्ही. एस. भाकरे यांचे शुभहस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. श्री. भाकरे यांचा संशोधन व विकास, मटेरिअल मॅनेजमेंट अशा शाखांमध्ये ४५ वर्षाहून अधिक कार्याचा अनुभव आहे. सोबत सेल्स व मार्केटिंग यामध्ये दोन दशके व १५ वर्षाहून अधिक अध्यापनाचे कार्य त्यांनी केले आहे. UDCT, (सध्या ICT) मुंबई या संस्थेतून 'Print Technology' या विषयातून त्यांचे पदव्युत्तर शिक्षण झाले असून श्री. भाकरे यांनी 'व्यवसाय व्यवस्थापन' (Business Management) या विषयातील पदव्युत्तर पदविकादेखील घेतली आहे.

'Taking India to the world though reverse Innovation' या विषयावरील त्यांच्या स्फुर्तीपर भाषणाचे प्राचार्य डी. के. नायक आणि उपस्थितांनी कौतुक केले.

प्राचार्य डी. के. नायक यांनी आपले मनोगत व्यक्त करून अशा कार्यक्रमाचे महत्त्व अधोरेखित केले. केमिकल इंजिनिअरिंग विभागाचे प्रमुख माजी प्राचार्य एस. एस. मुजुमदार यांनी या कार्यक्रमाचे संघटन सचिव म्हणून काम केले. त्यांनीही आपले मत व्यक्त केले. इन्स्ट्रुमेंटेशन विभागाच्या प्रा. सौ. शीतल म्हात्रे यांनी या उपस्थितांचे आभार मानले.

कार्यक्रमाच्या प्रथम सत्रात प्रा. एस. एस. मुजुमदार यांनी 'Heat Transfer' ची संकल्पना विषद केली. दुपारच्या सत्रात भांडुप येथील टोयो कंपनीचे वरिष्ठ व्यवस्थापक श्री. एन.बी. कुलकर्णी यांनी 'Design of heat exchangers' या विषयी माहिती दिली.

दुसऱ्या दिवशी प्रा. एस. एस. मुजुमदार यांनी 'Fluid Flow Fundamentals' या विषयी वेध घेतला. दुपारचे सम Fluid Flow या विषयात प्रभुत्व असलेले UDCT संस्थेतील प्रा. डॉ. डी. डी. काळे यांचे मार्गदर्शनाखाली पार पडले. 'Application of Fluid Flow in Industry' या विषयातील जटील (कठीण) संकल्पना त्यांनी अत्यंत सोप्या करून सांगितल्या.

तिसऱ्या दिवशी ठाणे स्थित 'इंडोफिल' या कंपनीत क्षेत्र भेटीचे (Field Visit) आयोजन केले होते. काही महत्त्वाच्या सूचना केल्यानंतर प्रशिक्षणार्थींना टँक फार्म विभाग, इन्फ्लुअंट ट्रिमेंट विभाग, बॉयलर व ॲनालिटिकल प्रयोगशाळा (लॅब) गॅस क्रोमॅटोग्राफी असे विविध विभाग दाखविण्यात आले. यानंतर Heat transfer, Fluid Flow या विषयाचे प्रात्याक्षिक करून घेण्यात आले.

कोणतीही इंडस्ट्री योग्य उपकरणाशिवाय काम करू शकत नाही, हे लक्षात घेवून चौथ्या दिवशी इन्स्ट्रुमेंटेशनच्या

'मी'चा अंत हा खरा एकांत आहे.

प्रोसेस इंडस्ट्रीशी असलेला संबंध समजावून सांगितला. प्रा. सौ. स्मिता डी. खंडागळे यांनी 'Role of instrumentation and Automation' ह्या विषयी माहिती सांगितली. दुपारच्या सत्रात प्रात्याक्षिकेदेखील करून घेण्यात आली.

पाचव्या दिवसाची सुरुवात भांडुप येथील टोयो इंजिनिअरींग कंपनीचे ॲसिस्टंट मॅनेजर श्री. शैलेश परांजपे यांच्या 'Plant Utilities' या विषयाने झाली. हवा, थंडपाणी, रेफ्रिजरण्टस् त्याचे प्रकार, त्याचे उपयोजन अशा गोष्टी समजावून सांगितल्या.

दुसऱ्या सत्राची सुरुवात टायो इंजिनिअरिंगचे कं. वरिष्ठ मुख्य इंजिनिअर डॉ. कौस्तुभ मुजुमदार यांच्या 'CFD मॉडेलिंग' या विषयाने झाली. आपल्या कक्षेपलिकडच्या वाटणाऱ्या या CFD मॉडेलिंगसारखा विषय डॉ. कौस्तुभ मुजुमदार यांनी दैनंदिन जीवनातील उदाहरणे देवून अगदी सोपा करून सांगितला.

समारोह समारंभात प्राचार्य डी. के. नायक, संघटन सचिव प्रा. एस. एस. मुजुमदार, प्रा. सौ. व्ही. ए. जोशी यांनी प्रशिक्षणार्थींच्या उत्कृष्ठ प्रतिसादाबद्दल आभार मानले. सर्व प्रशिक्षणार्थींनी देखील अशा कार्यक्रमाचा लाभ झाल्याबद्दल आभार मानले व असे कार्यक्रम सातत्याने व्हावेत अशी मते व्यक्त केली.

कार्यक्रम समितीतील व केमिकल इंजिनिअररिंग विभागाच्या प्रा. सौ. एस. ए. जोशी यांनी आभार प्रदर्शन केले.

**महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालय, वेळणेश्वर**

**१० जून ते ३१ डिसेंबर २०१३ पर्यंतचा अहवाल**

जून २०१३ मध्ये नवीन शैक्षणिक वर्षातील विद्यार्थ्यांसाठी प्रवेश प्रक्रिया संपन्न झाली. या वर्षासाठी अभियांत्रिकी शाखेच्या ६ अभ्यासक्रमांसाठी प्रथम वर्षात १२४ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला; तर अभियांत्रिकीची पदविका पास झालेल्या १३२ विद्यार्थ्यांनी थेट द्वितीय वर्षात प्रवेश घेतला. ७० विद्यार्थी प्रथम वर्षातून द्वितीय वर्षात आले. द्वितीय वर्षात एकूण २०२ विद्यार्थी शिकत आहेत.



**मेकॅट्रॉनिक्स या कार्यशाळेत तयार करण्यात आलेली उपकरणे**

प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर १० जुलै रोजी प्रथम वर्षातील प्रथम सत्र व द्वितीय वर्षासाठी तृतीय सत्रास प्रारंभ झाला. शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभीच दिनांक १२ जुलै रोजी यंत्रअणुविद्युत(मेकॅट्रॉनिक्स) या तीन दिवसाच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. मा. श्री. प्रसाद वैद्य यांच्या हस्ते या कार्यशाळेचे उदघाटन करण्यात आले. विविध प्रकारच्या प्रकाश माळा, सौर उर्जेवर चालणारे दिवे, मोबाईल चार्जर, अंधारात स्वयंप्रकाशित होणारे दिवे अशा निरनिराळ्या वस्तू कार्यशाळेत तयार करण्यात आल्या. कार्यशाळेत तयार केलेल्या वस्तूंचे प्रदर्शन दिनांक १९ जुलै रोजी आयोजित करण्यात आले. या प्रदर्शनास गुहागर परिसरातील प्राथमिक व माध्यमिक विद्यालयांतील जवळपास १००० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

उपस्थित शिक्षकवृंद व ग्रामस्थांनीही या प्रदर्शनास सहभागी होऊन अशा प्रकारची उपकरणे तयार करण्यास प्रोत्साहित केले. या कार्यशाळेतील सौर ऊर्जेवरील कल्पनांमध्ये भर पडावी या साठी महाविद्यालयातील भास्कराचार्य(B1) या इमारतीमधील एक प्रयोगशाळा पूर्णपणे यंत्रअणुविद्युत(मेकॅट्रॉनिक्स) या कार्यशाळेसाठी राखीव ठेवण्यात आली आहे.



**एका चित्राची कूळकथा या विषयावर व्याख्यान देताना संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर**

दिनांक १० ऑगस्ट रोजी संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांनी ''एका चित्राची कूळकथा'' या विषयावर व्याख्यान दिले.या व्याख्यानात इंग्रज, निजाम व पेशव्यांमध्ये टिपू सुलताना संदर्भात झालेल्या करारावर आधारित एका चित्राची कथा व त्यातून संशोधक वृत्तीने त्या चित्रांचा विविध अभ्यासकांनी केलेला अभ्यास याविषयी माहिती सांगितली.

दिनांक १९ ऑगस्ट रोजी प्रा. डी. आर. मेहता यांनी महाविद्यालयातील सहाय्यक प्राध्यापकांसाठी व प्रयोगशाळा सहाय्यक यांच्यासाठी "Future Development in Laboratory" या विषयावर व्याख्यान दिले. त्याचवेळी मेहता सरांच्या हस्ते मेकॅट्रॉनिक्स कार्यशाळेत भाग घेतलेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले.



**इंजिनिअरिंग विभागाच्या कार्यशाळेचे उदघाटन करताना संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर**

ऑगस्ट महिन्यात मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागाची कार्यशाळा सर्व उपकरणांनी सुसज्ज बनवण्यात आली. दिनांक १९ ऑगस्ट रोजी संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांच्या हस्ते या कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले.

दिनांक २० ऑगस्ट रोजी श्री. बिपीन पांचाळ यांनी टेलीकम्युनिकेशन व इन्स्टुमेंटेशन (उपकरणीकरण अभियांत्रिकी) विभागाच्या शिक्षकांकरिता चर्चासत्र घेतले व त्यांच्यातर्फे विद्यार्थ्यांना वापरता येतील अशी अनेक इलेक्ट्रॉनिक उपकरणे महाविद्यालयाच्या इलेक्ट्रॉनिक प्रयोगशाळेस भेट म्हणून दिली.



**प्रथम प्राचार्य डॉ. अविनाश चिंचोलकर यांचा निरोप समारंभ**

दिनांक २७ ऑगस्ट रोजी महाविद्यालयाचे प्रथम प्राचार्य डॉ. अविनाश चिंचोलकर यांनी कौटुंबिक

कारणास्तव नोकरी सोडण्याचा निर्णय दिल्यावर या दिवशी त्यांच्या कार्याच्या गौरवासाठी निरोप समारंभाचा कार्यक्रम आयोजित केला.

दिनांक २९ ऑगस्ट रोजी कोकण कृषी विद्यापीठाने शेतकी खात्याचे अधिकारी व ग्रामपंचायतींमधील ४० प्रशिक्षणार्थी यांचे शिबीर महाविद्यालयाच्या नाना फडणवीस सभागृहात घेण्यात आले. त्यांना तंत्रज्ञान व सौर उर्जेचा शेतीसाठी उपयोग या विषयावर डॉ. कमलाकर देसाई यांनी मार्गदर्शन केले.

दिनांक ३० ऑगस्ट रोजी नाना फडणवीस सभागृहामध्ये संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांचे 'युरोपियन देशांची संस्कृत भाषेतील अध्ययनाची रुची व विकास एक अभ्यास' या विषयावर व्याख्यान झाले.

दिनांक ३१ ऑगस्ट रोजी गुहागर व रत्नागिरीमधील शेतकऱ्यांना सौर उर्जेवर चालणाऱ्या उपक्रमांविषयी माहिती होण्यासाठी सौर उर्जेवर चालणाऱ्या ''सोलार निवास'' या विविध उपकरणांचे प्रात्यक्षिक एका घराचे मॉडेल तयार करून दाखविण्यात आले. याव्यतिरिक्त शेतातील पिकांचे संरक्षण होण्यासाठी सौर उर्जेवर चालणारे विद्युत कुंपण, पाण्याचा पंप या विषयी माहिती देण्यात आली. ही उपकरणे तयार करण्यासाठी श्री. सदानंद बोफर्डीकर यांनी विशेष परिश्रम घेतले. या मेकॅट्रॉनिक्स प्रयोगशाळेला Bio-kit या कंपनीने भेट दिली व यामध्ये बदल करून अधिकाधिक विकास करण्यासाठी सहकार्य केले.



**सोलार निवास**

दिनांक ३१ ऑगस्ट रोजी दापोलीच्या शेतकी महाविद्यालयाचे (कोकण कृषी विद्यापीठाचे) डॉ. बुरटे, डॉ. गोखले यांनी भेट दिली. महाविद्यालयात दुग्धशाळा व वृक्षारोपण होण्याच्या दृष्टीने पाहणी व चर्चा यावेळी करण्यात आली.

ऑगस्ट महिन्यातच भास्कराचार्य (B1) या इमारतीत द्वितीय वर्षासाठी ॲनॅलॉग इलेक्ट्रॉनिक्स लॅब, डिजिटल इलेक्ट्रॉनिक्स लॅब, ट्रान्सड्युसर अँड मेजरमेंट लॅब, मेकॅट्रॉनिक्स लॅब, इलेक्ट्रीकल लॅब तसेच कॉम्प्युटर लॅब सुरु करण्यात आल्या.

दिनांक १४ सप्टेंबर रोजी डॉ. गणेश तांबवे यांनी इन्स्ट्रुमेंटेशन विभागाच्या विद्यार्थ्यांना संशोधन अहवालाचे लेखन, संशोधनाचे महत्व या विषयी माहिती सांगितली. तर त्याच दिवशी महाविद्यालयाचे ग्रंथपाल श्री. संतोष चतुर्भुज यांनी या विभागातील विद्यार्थ्यांना डेटाबेसचा संशोधनातील वापर तसेच संशोधन अहवालामध्ये बिब्लिओग्राफीचा वापर कसा करावा, सायटेशन कसे असावे याविषयी मार्गदर्शन केले.

डॉ. सी. पी. गाडगीळ, माजी संचालक सिओईपी पुणे यांनी महाविद्यालयातील सहाय्यक प्राध्यापकांना तांत्रिक विषय कसा शिकवावा या विषयी मार्गदर्शन केले.

दिनांक १६ व १७ सप्टेंबर रोजी विद्या प्रसारक मंडळाच्या बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातील, environment science या विभागाच्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयास भेट दिली.

---

माझ्यातलं प्रेम काढा. मग मी उणारच नाही.

दिनांक २८ सप्टेंबर रोजी महाविद्यालयाच्या महाविद्यालयीन समितीची बैठक घेण्यात आली. या बैठकीस संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर, संस्थेचे चिटणीस श्री. रवींद्र रसाळ, महाविद्यालयाचे संचालक डॉ. कमलाकर देसाई, स्थानिक प्रतिनिधी म्हणून वैद्य ग्रुपचे श्री. प्रसाद वैद्य, प्रभारी प्राचार्या डॉ. शिल्पा कामात, शिक्षक प्रतिनिधी श्री. अविनाश पवार, श्री. रोहन गोंधळेकर व शिक्षकेतर प्रतिनिधी श्री. लोहार हे उपस्थित होते. गत व चालू शैक्षणिक वर्षातील प्रगतीचा आढावा या सभेत घेण्यात आला.

याच दिवशी डॉ. एच. ए. वालावलकर, (विद्युत) इलेक्ट्रीकल विभाग प्रमुख, व्हीजेटीआय, मुंबई यांनी प्रथम व द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच डॉ. काळे, प्राध्यापक, केमिकल टेक्नॉलॉजी विभाग, मुंबई विद्यापीठ यांनी मेकॅनिकल इंजिनिअरींग विभागाच्या विद्यार्थ्यांना "Careers for Mechanical Engineering in Plastic Industries" या विषयावर मार्गदर्शन केले.

दिनांक २९ सप्टेंबर रोजी महाविद्यालयाच्या नाना फडणवीस सभागृहामध्ये ''कोपर्निकस सिद्धांत एक चौर्य कर्म'' या विषयावर संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांचे व्याख्यान झाले. या व्याख्यानात कोपर्निकसने मांडलेल्या सुर्यकेंद्री सिद्धांताचे मूळ भारतीय आहे, याचे पुरावे व ज्ञानाचे युरोपियन देशांकडे झालेले संक्रमण याविषयी विचार मांडले.

याच दिवशी महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्याना ताण तणावातून मुक्त करण्यासाठी व मानसिक आरोग्य चांगले राहण्यासाठी मन:शांती शिबीर घेण्यात आले. या शिबिरात श्री. सतीश बोफर्डीकर यांनी व्याख्यानाद्वारे व योग प्रात्यक्षिकाद्वारे उपयुक्त माहिती सांगितली.

दिनांक ६ ऑक्टोबर रोजी आय. आय. टी. बॉम्बे येथील डॉ.दीपक फाटक यांनी महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थ्यांसाठी Building India Where Dreams come True-Journey to an Exciting Mentoring Career या विषयावर व्याख्यान घेऊन सर्वांमध्ये नवचैतन्य निर्माण केले.व्याख्यानात त्यांनी सांगितले की भारत देशाला विकसित देशात रुपांतरित करावयाचे असेल तर आजच्या युवा पिढीने उद्याच्या पिढीचे Mentor (मार्गदर्शक/समुपदेशक) होणे आवश्यक आहे. चांगले मार्गदर्शक होण्यासाठी यशस्वी मोजमापन, संशोधन वृत्ती, स्वतःवरील आत्मविश्वास, रॅट रेस पासून स्वतःला परावृत्त ठेवणे, नैतिकतेचे प्रमाण या गुण विषयी माहिती सांगितली. अध्ययन–अध्यापन प्रक्रियेमधील वेळ वाचवा, विद्यार्थी व शिक्षकांतील चर्चा सुसंवाद वाढावा, तसेच विद्यार्थ्यांना केवळ सैद्धांतिक माहिती देण्यापेक्षा प्रात्यक्षिक, प्रत्यक्ष उदाहरणे व त्यांचे व्यावहारिक उपयोजन शिकण्यास वेळ मिळावा; यासाठी Flipped Classroom ची आवश्यकता डॉ. फाटकांनी यावेळी मांडली.

दिनांक २१ ऑक्टोबर रोजी सौ. अंजना रोट्रीस, सहाय्यक प्राध्यापिका यांनी Conventional and non conventional power Generation - "Renewable energy" या विषयावर; तर विपुल गोईल, सहाय्यक प्राध्यापक, मुकेश पटेल टेक्नॉलॉजी, मॅनेजमेंट अँड इंजिनिअरींग कॉलेज, मुंबई यांनी "Digital electronics - Introduction to VHDL, CPLD & FPGA" या विषयांवर इलेक्ट्रिकल विभागाच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

दिनांक २९ ऑक्टोबर रोजी प्रायोजित विज्ञान या विभागातर्फे प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांना गणित विषयाचे मार्गदर्शन करण्यासाठी श्री. विक्रम थत्ते यांना गेस्ट लेक्चरर म्हणून बोलावण्यात आले. त्यांनी विद्यार्थ्यांना दोन दिवस उत्तम मार्गदर्शन केले.

दिनांक २० आणि २१ नोव्हेंबर रोजी सृजन या वैज्ञानिक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. ही स्पर्धा ११ वी व १२ वी विज्ञान विभागाच्या विद्यार्थ्यांसाठी होती.



वैज्ञानिक स्पर्धेतले टिपलेले वेचक

विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेला वाव मिळावा, त्यांच्यातील कल्पकता वाढावी व संशोधन वृत्तीचा विकास व्हावा या उद्देशाने ही स्पर्धा घेण्यात आली. ही स्पर्धा निबंध लेखन, प्रश्न मंजुषा व वैज्ञानिक प्रयोग अशा तीन स्तरावर घेण्यात आली. विद्या प्रसारक मंडळाच्या अॅकॅडमी इंटरनॅशनल एज्युकेशन अँड रिसर्च या विभागाचे डीन डॉ. सुधाकर आगरकर यांनी या स्पर्धेचे परीक्षक म्हणून काम पहिले.

वैज्ञानिक प्रयोग या स्पर्धेसाठी श्री. लायमुन, श्री. प्रसाद वैद्य व श्री. सतीश जाधव आणि महाविद्यालयाच्या मेकॅनिकल विभागाचे प्रमुख डॉ. अनिश गांगल यांनी काम पहिले. निबंध स्पर्धेमध्ये धीरज राकेश शुक्ला याने प्रथम क्रमांक,प्रिती लोंढे हिने द्वितीय क्रमांक तर प्राची सूर्यकांत वीरकर हिने तृतीय क्रमांक प्राप्त केला. प्रश्न मंजुषा कार्यक्रमात डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालय आणि कनिष्ठ महाविद्यालय, महाड या गटाने प्रथम क्रमांक, बॅरिस्टर नाथ पै विद्यालय आणि कनिष्ठ महाविद्यालय, हर्चे या गटाने द्वितीय क्रमांक तर तृतीय क्रमांक खेडच्या ज्ञानदीप विद्यामंदिर या गटाने मिळवला. वैज्ञानिक प्रयोगाचे प्रथम पारितोषिक एन.इ.एस. ज्युनिअर कॉलेज, पेढे परशुराम महाविद्यालयाने तर द्वितीय पारितोषिक ज्ञानदीप विद्यामंदिर, भडगाव खेड या महाविद्यालयाने तसेच तृतीय पारितोषिक बॅरिस्टर नाथ पै विद्यालय आणि कनिष्ठ महाविद्यालय, हर्चे या महाविद्यालयाने मिळविला.

दिनांक ५ डिसेंबर रोजी महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना फोटोशॉप या सॉफ्टवेअरची माहिती व्हावी व प्रत्येकाला फोटोमध्ये हवातसा बदल करता यावा यासाठी संगणक अभियांत्रिकी विभागाचे प्रयोगशाळा सहाय्यक श्री. सुकुमार बिर्जे यांनी कार्यशाळा घेतली. कार्यशाळेत त्यांनी सैद्धांतिक व प्रात्यक्षिक माहिती सांगितली.

दिनांक ९,१०,११ डिसेंबर रोजी डॉ. होमी भाभा नागरी, गुहागर हायस्कूल येथे गुहागर तालुका विज्ञान प्रदर्शन भरविण्यात आले होते. महर्षी परशुराम महाविद्यालयाने सौर ऊर्जेवरील उपकरणांचे भव्यप्रदर्शन करून यात सहभाग नोंदविला. तसेच दिनांक ११ डिसेंबर रोजी भौतिकशास्त्र विषयाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. गणेश तांबवे यांनी ''मंगळ यान-भारताचे मंगळ अभियान'' या विषयावर व्याख्यान दिले. यामध्ये भारताच्या मंगळ अभियानाबद्दल माहिती सांगितली तसेच या मंगळ अभियानाचे टप्पे व्हिडिओ क्लिपच्या माध्यमातून समजावून सांगितले.



''मंगळ यान-भारताचे मंगळ अभियान'' या विषयावर व्याख्यान देताना डॉ. गणेश तांबवे

चिपळूण तालुक्यातील माध्यमिक व कनिष्ठ माध्यमिक शाळा सहविचार मंच या उपक्रमा अंतर्गत एकत्र येतात. चालू शैक्षणिक वर्षात दिनांक १९ डिसेंबर, रोजी तालुक्यातील सर्व शाळा नऊ सहविचार मंचांच्या केंद्रांवर एकत्र जमल्या. त्यात ४६ शाळांनी सहभाग नोंदविला. या केंद्रांवर महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या नऊ गटांनी एकाच दिवशी जागतिकीकरणाचा शिक्षण पद्धतीवर होणारा परिणाम या विषयी व्याख्यान दिले.यात जागतिकीकरण व शिक्षण यांचा संबंध सांगण्यात आला व शिक्षणाचे जागतिकीकरण होण्यासाठी संगणक शिक्षणाची आवश्यकता यावेळी सांगण्यात आली.



**सहविचार मंच या उपक्रमा अंतर्गत जागतिकीकरणाचा शिक्षण पद्धतीवर होणारा परिणाम या विषयावर व्याख्यान देताना श्री. संतोष चतुर्भुज**

हा उपक्रम यशस्वी होण्यासाठी संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांनी स्वतः दापोली येथे जाऊन शिक्षकांना मार्गदर्शन केले. तसेच महाविद्यालयाचे संचालक डॉ. कमलाकर देसाई, प्रभारी प्राचार्या डॉ. शिल्पा कामात, श्री. संतोष चतुर्भुज, श्री. रोहन गोंधळेकर,श्री. अविनाश पवार, डॉ. श्रुती मेहेंदळे, सौ. रश्मी ताम्हनकर, श्री. औदुंबर पाटकर, श्री. प्रशांत महाजन, श्री. अवधूत आपटे, श्री. अमित माने व इतर सहाय्यक प्राध्यापक आणि प्रयोगशाळा सहाय्यक कर्मचाऱ्यांनी हा उपक्रम यशस्वी होण्यासाठी मेहनत घेतली.

दिनांक २० डिसेंबर रोजी श्री. हिमांशू काणे मॅनेजिंग पार्टनर, डब्ल्यू. एस. काणे अँड कंपनी यांनी "Overview on the Laws relating to Intellectual Property Rights" या विषयावर व्याख्यान घेतले. महाविद्यालयातील सहाय्यक प्राध्यापकांना पेटंट म्हणजे काय? तसेच बौद्धिक दृष्टिकोनातून आपण केलेल्या संशोधनाचे रजिस्ट्रेशन, डॉक्यूमेंटेशन करणे किती आवश्यक आहे व कायदेशीररित्या ते कसे करावे या विषयीची माहिती श्री. काणे यांनी यावेळी दिली.

चालू शैक्षणिक वर्षाच्या प्रथम सत्रामध्ये महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या ग्रंथालयाने इंट्रानेटवरील ई-ग्रंथालयात अभियांत्रिकीच्या अभ्यासक्रमानुसार आवश्यक असलेले NPTEL चे व्हिडिओज ठेवण्यात आले आहेत. तसेच विविध विभागांच्या सहाय्यक प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांना करून दाखविलेल्या प्रात्यक्षिकांचे व्हिडिओदेखील इंट्रानेटवर ठेवण्यात आले आहेत. या व्यतिरिक्त शिक्षकांनी वेळोवेळी तयार केलेल्या व्याख्यानांच्या नोट्स इंट्रानेटवर ठेवण्यात आल्या आहेत. इंट्रानेट समृद्ध होत असल्यामुळे व विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार त्यात माहिती संग्रहित होत असल्यामुळे विद्यार्थ्यांचा इंट्रानेट वापरण्याकडे कल वाढत चालला आहे. अनेक विद्यार्थ्यांकडे लॅपटॉप नसल्यामुळे

ग्रंथालयाने हे व्हिडिओ पाहण्यासाठी स्वतंत्र व्हिडिओ रूम तयार केली असून तेथे एकावेळी २०-२५ विद्यार्थी बसण्याची व्यवस्था केली आहे. त्या व्हिडिओ रूमचे विभागवार वेळापत्रक बनवून विद्यार्थ्यी तेथे IIT मध्ये झालेल्या व्याख्यानांचा लाभ घेऊ शकतात.

या वर्षाच्या प्रथम सत्रात अनेक मान्यवरांनी महाविद्यालयास भेटी दिल्या. जपान मधील क्युटोसंग विद्यापीठातील संस्कृतचे प्राध्यापक डॉ. यानो यांनी महाविद्यालयास भेट दिली व सृजन या स्पर्धेचे प्रमुख अतिथी व परीक्षक म्हणून काम पहिले. तसेच नोव्हेंबरला श्री. मुकुंद मराठे, सौ. बकुळ पंडित, श्री. ज्ञानेश पेंढारकर, श्री. श्रीराम केळकर या संगीत क्षेत्रातील दिग्गज व्यक्तींनी महाविद्यालयास भेट दिली. तसेच श्री. बिपीन पांचाळ, वरिष्ठ टेलिकॉम इंजिनिअर, समसंग, डॉ. सुधीर आगाशे आणि कुटुंबीय, डॉ. अनिल सावंत, श्री. विजय इंगळे, विभागीय कृषी सहसंचालक, ठाणे, श्री. राजेश बेंडल, उपसभापती, पंचायत समिती,गुहागर, डॉ. दीपक नाईक, मुख्य अभियंता, बी एम सी व कुटुंबीय, सौ. शोभा वालावलकर इ. मान्यवरांनी महाविद्यालयास भेटी दिल्या.

या सत्रात डिसेंबर महिन्यात आबलोली माध्यमिक विद्यालय, गोपाळकृष्ण विद्यामंदिर, गुहागर या विद्यालयांनी अभ्यास सहल म्हणून या महाविद्यालयास भेटी दिल्या व महाविद्यालयातील सोलर उपकरणांविषयी जाणून घेतले.

अशा प्रकारे चालू शैक्षणिक वर्षात महाविद्यालयाने अनेक सामाजिक, शैक्षणिक उपक्रम राबवले. तंत्रज्ञानाचा प्रसार करण्यासाठी महाविद्यालयाचे संचालक डॉ. कमलाकर देसाई यांनी विशेष मेहनत घेतली.

•••

## *मायक्रोस्कोपी*

*बनारस हिंदू विद्यापीठ, वाराणसी यांच्या सहकार्याने २०१२ मध्ये एक महत्त्वाची परिषद वजा कार्यशाळा इलेक्ट्रॉन मायक्रोस्कोप सोसायटी ऑफ इंडिया व धातू अभियांत्रिकी विभाग (इक्का) यांच्यातर्फे घेण्यात आली होती. बनारस हिंदू विद्यापीठाचे संस्थापक पंडित मदन मोहन मालविय यांच्या १५० व्या जन्मवर्षानिमित्ताने झालेल्या या परिषदेत अनेक विद्यापीठातील अभ्यासकांनी भाग घेतला होता. मायक्रोस्कोपीमध्ये अलीकडील अद्ययावत तांत्रिक प्रगतीमुळे व विज्ञानाच्या वाढत्या अभ्यासामुळे मायक्रोस्कोपीत झालेले बदल व प्रगती यांचा या संशोधकांनी उहपोह केला.*

*संदर्भ : करंट सायन्स खंड १०४, क्र. ६ २५ मार्च २०१३ पृ. ६९२ ते ६९४.*

•••

दिशा नियमित वाचा.

*आपली मते जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.*

सोपे काम पुढे ढकलले तर अवघड बनते आणि अवघड काम पुढे ढकलले तर ते अशक्यच होते.

# जाहीर आवाहन

**विद्या प्रसारक मंडळ, ठाणे :**

विद्या प्रसारक मंडळ १९३५ सालापासून गेली सुमारे ७५ वर्षे ठाण्यात शैक्षणिक प्रसाराचे कार्य करीत आहे. आधुनिक पद्धतीचे व जागतिक दर्जाचे अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्याचा मंडळाचा मानस आहे.

**कोकण परिसराची निवड :**

एका बाजूला समुद्रकिनारा व दुसऱ्या बाजूला सह्याद्रीच्या रांगा यांच्या मधील या पट्ट्यातील जनता गेली सुमारे ४०० वर्षे उत्पादन क्षमता नसल्यामुळे जगण्यासाठी झगडत असते. पर्यटन व्यवसाय हाच काय तो व्यवसाय त्यांना थोडीफार साथ देत असतो.

कोकणातल्या रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांची एकूण लोकसंख्या जवळ जवळ ३० लाख आहे. तरी सुद्धा उच्च शिक्षणामध्ये दोन्ही जिल्हे मागास म्हणून गणले जातात आणि त्याचे कारण म्हणजे, उच्च शिक्षणाकडे कमी वळतात हे आहे. २००७ साली दिल्लीच्या विद्यापीठ अनुदान आयोगाने स्थापन केलेल्या एका समितीने संपूर्ण देशभर याविषयावर सर्वेक्षण करून आपला अहवाल सादर केला होता. त्या अहवालात संपूर्ण देशात ज्या भागामध्ये पुढे येण्याची प्रवृत्ती दिसत नाही, अशा भागांत आधुनिक धर्तीवर महाविद्यालये मोठ्या संख्येने निर्माण केली पाहिजे असे मत मांडले होते. भारताची उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्यांची सरासरी फक्त १२.४ आहे. त्या समितीला असेही आढळून आले की ५९३ जिल्ह्यांपैकी ३७४ जिल्हे असे आहेत की त्याठिकाणी उच्च शिक्षणासाठी काहीच सोयी नाहीत. महाराष्ट्र राज्यात उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्यांच्या टक्केवारीचे प्रमाण १७.३३ टक्के असून रत्नागिरी जिल्ह्याची उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची टक्केवारी सर्वांत कमी आहे.

उच्चशिक्षण देणाऱ्या ७० टक्के संस्था एक तर मोठ्या शहरांत किंवा नागरी भागांत आहेत. याचे मुख्य कारण तेथील विद्यार्थ्यांना खर्चिक उच्च शिक्षण घेणे परवडते व शिक्षणासाठी आवश्यक शिक्षकवर्गही उपलब्ध होतो. यामुळे ग्रामीण भागांतील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी मोठ्या शहरातील महाविद्यालयांमध्ये जावे लागते. यावर उपाय एकच, की अशा प्रकारच्या संस्था आणि उच्च दर्जाचे शिक्षण देणारी महाविद्यालये ही ग्रामीण भागात काढली जावीत. यासाठी आवश्यक त्या मुलभूत सोयी सुविधा उपलब्ध करणे व त्यासाठी लागणारा खर्च करणे यांची पूर्तता करावी लागते. त्यामुळे गरजू व हुशार ग्रामीण विद्यार्थ्यांची सोय तर होईल; पण त्या ग्रामीण भागाचा मोठ्या प्रमाणावर विकास घडून येईल. तिथल्या लोकांचा फायदा व गरजूंना कामधंदे उपलब्ध होतील आणि त्या ग्रामीण भागाचे महत्त्वही वाढेल.

**विद्या प्रसारक मंडळाच्या नवीन प्रकल्पविषयी:**

**कोकणातील गुहागर जवळ असलेला वेळणेश्वर हा ग्रामीण भाग मंडळाने नियोजित शैक्षणिक प्रकल्पासाठी निवडला आहे.** त्या गावची लोकसंख्या जवळपास ३५०० आहे व अशा गावात सुमारे ६५ एकर वरकस जमीन मंडळाने खरेदी केली आहे. तेथे एक शंकराचे सुरेख मंदिर आहे. त्याला वेळणेश्वर असे नाव आहे. शिवाय अरबी समुद्राची किनारपट्टी ही या गावाला लागून आहे. सरकारच्या नियोजित आराखड्याप्रमाणे लवकरच तयार होणार सागरी किनारपट्टी महामार्गही वेळणेश्वर गावाच्या बाजूने जाणार आहे.

या वास्तू समूहामध्ये ६ शैक्षणिक विभागांसाठी स्वतंत्र इमारती, प्राचार्य व प्रबंधकासाठी बंगले, विषय प्रमुख व प्राध्यापक व प्रमुख कर्मचारी यांच्यासाठी स्वतंत्र वास्तू

आणि विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे व इतर संबंधित वास्तू असे सर्व मिळून दहा लाख चौरस फुटांचे बांधकाम असलेला प्रकल्पाचा पूर्ण **खर्च १५० कोटी रुपये पर्यंत अपेक्षित आहे**. त्यामध्ये ३००० विद्यार्थी निरनिराळ्या विभागांतून शिक्षण घेतील. शिक्षकी पेशातील, कार्यालयीन कर्मचारी, शास्त्रीय व इतर विषयांचे तंत्र आणि सादिलवार कामे करणारे असे सर्व मिळून १००० व्यक्ती असतील. शिवाय वरील अनुषंगाने इतर कामे करण्यासाठी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष इतरही व्यक्तींची वर्दळ वाढेल. याशिवाय, प्रकल्प सुरू झाल्यानंतर प्रकल्पा बाहेरच्या व्यक्तींनासुद्धा वाव मिळेल.

प्रकल्पाचा कल्पकतापूर्ण आराखडा जो ३००० विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी तयार केला आहे. त्याला चिपळूणच्या सहाय्यक जिल्हाधिकाऱ्यांनी मंजुरी दिली असून, त्याचा पहिला टप्पा २०१२ पर्यंत पूर्ण होणार आहे. सुरुवातीला ३०० विद्यार्थ्यांना प्रवेश अपेक्षित असून अभियांत्रिकीचा एकूण ४ वर्षाचा पदवी अभ्यासक्रम असेल. २०१२-१३ शैक्षणिक वर्षापासून अभियांत्रिकी महाविद्यालय चालू करण्यात येणार आहे. त्यानंतर नव्याने अभियांत्रिकी, व्यवस्थापन, वास्तुशास्त्र आणि हॉटेल व्यवस्थापन याप्रमाणे नवीन अभ्यासक्रम सुरू होतील.

**देणगीसाठी व मुदत ठेवीसाठी आवाहनः**

मंडळाला दानशूर, समाजसेवक, उदारमताच्या व्यक्ती, यांच्याकडून मिळणाऱ्या आर्थिक मदतीशिवाय दुसरा कोणताही उत्पन्नाचा मार्ग नाही. तुटपुंज्या फीच्या उत्पन्नामध्ये अशी नवीन महाविद्यालये निर्माण करणे शक्य नाही आणि म्हणून या सर्व बांधकामासाठी लागणारा आर्थिक पुरवठा बँकांकडून कर्ज घेऊन व जनतेकडून देणारी स्वरूपात मदत घेऊन करण्यात येतो.

नियोजित अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या बांधकामासाठी बँकेकडून मिळणाऱ्या कर्जाव्यतिरिक्त लागणारा निधी उपलब्ध करण्यासाठी रु. १० कोटींपर्यंत खालील अटींवर वैयक्तिक ठेवी स्वीकारण्यास धर्मादाय आयुक्त, मुंबई यांनी मान्यता दिली आहे.

१) संस्थेकडे ठेवण्यात येणाऱ्या ठेवी या कमीतकमी रु. ५०००/- त्याच्या पटीत स्वीकारण्यात येतील.

२) सदर ठेवीचा कालावधी ५/७ व १० वर्षांचा असेल. किमान ३ वर्षांपर्यंत ठेव परत केली जाणार नाही.

३) ठेवीसाठी वारसदार नेमणे आवश्यक असेल.

४) ठेवीच्या कालावधीत ठेवीदाराचा मृत्यू ओढवल्यास त्याच्या वारसास पंधरा दिवसात ठेव परत करण्यात येईल.

५) सदर ठेवीवर दरसाल दर शेकडा ५ टक्के सरळ व्याज दराने प्रत्येक वर्षाच्या मार्च महिन्याच्या अखेरीस व्याज देण्यात येईल.

६) काही अपरिहार्य कारणामुळे मुदतीपूर्वी ठेव मोडावयाची असल्यास, ठेवीदाराने ३ महिन्याची आगाऊ सूचना देणे आवश्यक असेल व ती मुदत ठेव ठेवल्यापासून सहा महिन्याच्या आत मोडल्यास त्यावर व्याज अनुदेय राहणार नाही.

या प्रकल्पावरती पुढील १० वर्षात सुमारे १५० कोटी रुपये खर्च होईल. हा प्रकल्प पूर्णत्वास जाणे हे त्यावेळेसच शक्य होईल, जेव्हा सर्व स्तरांतील दानशूर व्यक्ती व संस्थांचा हातभार लागेल. **या आवाहनातर्फे आम्ही आपणांस विनंती करतो की आपण अशा शैक्षणिक कार्यास सढळ हस्ते देणगी किंवा मुदत ठेवीच्या स्वरूपात मदत करावी व मंडळाच्या या राष्ट्रीय स्वप्नपूर्तीस हातभार लावावा.**

आपला विश्वासू,
**डॉ. विजय बेडेकर**
कार्याध्यक्ष
विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

●●●

सुखरुप असतां म्हणे माझें माझें। संकट देखोनियां घाली देवावरी बोझें।। - संत एकनाथ महाराज

# विद्या प्रसारक मंडळ

विष्णुनगर, नौपाडा, ठाणे ४००६०२.
दूरध्वनी : ०२२-२५४२६२७०

भारतातील महान गणितज्ज्ञ व खगोलशास्त्रज्ञ भास्कराचार्य यांच्या सन्मानार्थ ठाणे येथील विद्या प्रसारक मंडळ या संस्थेने त्यांचे ९०० वे जन्म वर्ष साजरे करायचे ठरविले आहे. त्या निमित्ताने तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित केली आहे.

अनेक पिढ्या ज्योतिषशास्त्राची परंपरा असणाऱ्या विद्वान कुटुंबात भास्कराचार्यांचा इ. स. १११४ साली जन्म झाला. सर्व ज्ञानशाखांत नैपुण्य मिळवत त्यांनी गणित व खगोलशास्त्राच्या साहित्यात मोलाची, महत्त्वाची भर टाकली. विषयाची परिपूर्ण हाताळणी, साहित्याचे विचारपूर्ण संगठन केले आणि विषय स्पष्टपणे मांडले, ज्याचा येणाऱ्या शतकांतील विषयांच्या विकासावर प्रभाव पाहावयास मिळतो. भास्कराचार्यांच्या साहित्याचा सर्व देशांत अभ्यास केला जातो व त्यावर अनेक प्रकारचे टीकात्मक व अभ्यासपूर्ण साहित्य निर्माण केले जाते.

# भास्कर ९००

## आंतरराष्ट्रिय परिषद

## भास्कराचार्यांच्या ९०० व्या जन्म वर्षनिमित्ताने

विबुधाभिवन्दितपदो जयति श्रीभास्कराचार्यः

शुक्रवार दि. १९; शनिवार दि. २० आणि रविवार दि. २१ सप्टेंबर २०१४

स्थळ :
थोरले बाजीराव पेशवे सभागृह,
ज्ञानद्वीप, ठाणे महाविद्यालय परिसर,
चेंदणी, बंदर रोड, ठाणे, महाराष्ट्र, भारत - ४०० ६०१

http://www.vpmthane.org/bhaskara900/

भास्कर ९००

(Cover No. 3)

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- *अत्याधुनिक दृक्‌श्राव्य यंत्रणा*
- *वातानुकूलित प्रसन्न वातावरण*
- *वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा*

*अशा सुविधांनी युक्त*

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत, ३ रा मजला | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि.प्र.मं.चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

## ❋ संपर्क ❋

कार्यवाह
**विद्या प्रसारक मंडळ**
विष्णूनगर, नौपाडा, ठाणे – ४०० ६०२
दूरध्वनी क्रमांक – २५४२६२७०

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे-४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.